उम्मूल मोमीनीन हजरत आएशा (रजि.) ह्या तमाम मुसलमानांच्या माता आहेत. त्या घरेलू व धार्मिक शिक्षणात पारंगत होत्या. प्रेषितांचे सहकारी त्यांना शंका विचारीत होते. त्यांचे जीवन म्हणजे एक महान आदर्श आहे. हजरत आएशा (रजि.) यानी आपले सारे जीवन इस्लामच्या नीती नियमानुसार व्यतीत केले.ही गोष्ट अन्य सामान्यांना जमणारी नाही. उर्दू आणि अरबी भाषेत अनेक ग्रंथ उपलब्ध आहेत. मराठी भाषेत असे ग्रंथ उपलब्ध नाहीत. ख्यातनाम साहित्यिक मौलाना सय्यद सुलेमान नदवी यानी हजरत आएशा (रजि.) यांचा चरित्रग्रंथ रेखाटलेला आहे. अशा ग्रंथांचा आधार घेऊन डॉ.इ.जा.तांबोळी यांनी मराठी भाषेत हजरत आएशा (रजि.) यांचा चरित्रग्रंथ रेखाटलेला आहे. ईश्वराने त्यांनी केलेल्या श्रमाला स्वीकारावे ही माझी प्रार्थना!

मौलाना म.इब्राहिम जाहूरकर कासमी

अध्यक्ष


जमिएत-उलमा-ए-हिंद, शाखा-जिल्हा सोलापूर.

ISBN 978-81-936658-7-9

9 788193 665879

mayur

Publication & Distributor



उम्मूल मोमिनींन हजरत

आएशा

सिद्दीका (रजि.)

प्रा.डॉ.इ.जा.तांबोळी

danish artist

उम्मूल मोमिनीन हजरत आएशा (रजि)

प्रा.डॉ.इ.जा. तांबोळी
प्रमुख, मराठी विभाग
सोशल महाविद्यालय, सोलापूर.

उम्मूल मोमिनीन हजरत आएशा (रजि)
(चरित्रग्रंथ)

* **लेखक**
प्रा.डॉ.इ.जा.तांबोळी
प्लॉट नं.११ सुफी वजीरनगर
विजापूर रोड, सोलापूर - ४१३००५.
मो.नं. ९८९०९१९११८

* **सर्व हक्क श्री. अय्युब नल्लामंदू**
५४६, साखर पेठ, सोलापूर.
मो. ९७६६८१९९८१

* **प्रकाशक**
मयुर प्रकाशन
सोलापूर.

* **मुखपृष्ठ**
सय्यद इक्बाल,
दानिश आर्ट,
सोलापूर.

ISBN : 978-81-936658-7-9

* **प्रथमावृत्ती- १ फेब्रुवारी २०१९**

* **स्वागत मूल्य**
५०/- (पन्नास रूपये)

मनोगत

अल्लाहच्या कृपेने मी उम्मुल मोमीनीन हजरत आएशा (रजि) यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे. हे सारे व्हावे ही अल्लाहचीच इच्छा आहे. ही माझी भावना आहे. मी फक्त जागल्याचे काम केले आहे. मा. अ. लतीफ नल्लामंदू यांनी या पुस्तकाचा अभ्यास केला. हिंदीत हे चरित्र रेखाटले. विविध मौलाना व तज्ज्ञ यांच्याशी चर्चा पण केली. एक सुंदर पुस्तक हिंदीत लिहून पूर्ण केले. माझा व अ. लतीफ नल्लामंदू यांचा स्नेह हा बापलेकाचा आहे. मी त्यांच्या कार्याचा गौरव करणारा 'कासिदकार' हा चरित्र ग्रंथ रेखाटला. त्यानिमित्ताने या कुटुंबाशी माझा स्नेह व ऋणानुबंध वाढला.

हिंदीतील हे पुस्तक मी वाचले. मला असे वाटते की इस्लामचा इतिहास व इतर माहिती सांगणारे हजारो ग्रंथ विविध भाषेत प्रकाशित झालेले आहेत. हिंदीत व मराठीत कमी प्रमाणात ग्रंथ उपलब्ध आहेत. मराठीत मात्र खूपच कमी प्रमाणात ग्रंथ आढळतात. हजरत आएशा (रजि) यांच्यावरील मराठीतील हा पहिला चरित्रग्रंथ आहे. असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. आजच्या धावत्या जगात स्त्री व पुरुषांनी कसे जगावे? या

प्रश्नाचे उत्तर या ग्रंथात सापडणार आहे असे मला वाटते.

मी माझ्या पुस्तकाविषयी जास्त काही बोलणे गैर आहे. हजरत आएशा (रजि) यांच्या जीवनातील संघर्ष व तपस्या मानवी जीवनाला प्रेरणा देणारे ठरेल. यात काही शंका नाही. हा ग्रंथ सुंदर नि नीटनेटका व्हावा यासाठी प्रविण बंडी यांनी मेहनत घेतली. छपाईचे काम अतिशय सुंदर केले. माझे स्नेही महेश दिड्डी यांनी उत्तम रीतीने अक्षरजुळणी करून दिली. माझ्याच नावाचा हा कलंदर चित्रकार व दिग्दर्शक सय्यद इक्बाल याने या पुस्तकाचे मुखपृष्ठ रेखाटले. मा. शफीक काझी यांनी या पुस्तकाला प्रस्तावना लिहून मोलाचे मार्गदर्शन केले. त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

ज्ञात-अज्ञात या सर्वांनी मला जी मदत केली व माझे मनोबल वाढविले या सर्वांचा मी आभारी आहे. या ग्रंथातील मजकुराशी अनुवाद व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. यात काही कमतरता असेल तर वाचकांनी, तज्ज्ञांनी आम्हाला मार्गदर्शन करावे. पुढील आवृत्तीत दुरूस्ती करण्यात येईल. एखादा अनुभव आपल्या अनुभवाशी जुळत असेल तर तो एक निव्वळ योगायोग समजावा. मराठी साहित्यात अनेक चरित्र ग्रंथ दाखल झाले. हजरत आएशा (रजि) यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकणारा हा ग्रंथ सर्वांनाच आवडेल असे मला वाटते. मराठी साहित्य दरबारात या ग्रंथाचे स्वागत होईल अशी आशा बाळगतो.

– प्रा.डॉ.इ.जा. तांबोळी
प्रमुख, मराठी विभाग, सोशल कॉलेज, सोलापूर.

प्रस्तावना

महाराष्ट्रात मराठी ही मुख्य भाषा आहे. महाराष्ट्रात सर्व जातीधर्माचे लोक राहतात. महाराष्ट्र हे पुरोगामी चळवळीचे केंद्र आहे. ह्या मराठी मुलुखात एक मोठी लोकसंख्या मुस्लीम समाजाची आहे. संपूर्ण महाराष्ट्रभर हा समाज विखुरलेला आहे. ह्या समाजाचा कल मुख्यतः उर्दू शिकण्याकडे आहे. कारण ज्या धर्माशी म्हणजेच इस्लामशी हा समाज निगडीत आहे, त्या इस्लाम धर्माचे साहित्य उर्दूतच आहे.

जेथे मुस्लिमेतर समाज ८० टक्केहून जास्त वसतो आणि ज्याची मायबोली मराठी आहे, त्या समाजाबरोबर मुस्लीम समाज राहत आहे. आज मुस्लीम समाज मराठी भाषेकडे वळला आहे. ह्या मराठी भाषिक मुस्लीम समाजासमोर सर्वात मोठी अडचण ''इस्लाम धर्माचे ज्ञान'' उर्दूत आहे. इस्लामविषयी, मुहम्मद (स्व.) पैगंबरांच्या जीवनाविषयी फारच कमी माहिती मराठी भाषेत उपलब्ध आहे. तसेच मुस्लिमेतर मराठी भाषिकसुद्धा ह्या उदात्त धर्माविषयी आणि मानवतेचे उपकार अखिल मानवजातीचे प्रेषित मुहम्मद (स्व.) विषयी फारच थोडी माहिती बाळगतात आणि त्याचे कारण सुद्धा इस्लामी साहित्य मराठीत नसणे, हेच होय.

पण आम्हा सर्व मराठी भाषिकांचे सुदैव आहे की, अलीकडील

काळात मुस्लीम समाजातून मराठी लेखक पुढे येत आहेत आणि इस्लाम धर्माची माहिती मराठी भाषिकांना करून देत आहेत.

डॉ. इ. जा. तांबोळी सर जे सोलापूरमधील सोशल महाविद्यालयात मराठी विभाग प्रमुख आहेत, त्यांनी इस्लामचे मूळ ज्ञान किंवा माहिती मराठी भाषिकासाठी आणण्यासाठी पाऊल उचललेले आहे. त्यांची अनेक पुस्तक मराठी भाषेत उपलब्ध आहेत.

सदरहू ''उम्मूल मोमीनीन हजरत आयेशा (रजि.)'' हे पुस्तक सुद्धा त्याचाच एक भाग आहे. उम्मूल म्हणजेच माता आणि मोमीनीन म्हणजे समस्त मुस्लीम समाजाच्या माता. मुहम्मद पैगंबरांनी अनेक विवाह केलेले आहेत. (त्यास विविध कारणे आहेत.) इस्लाममध्ये मुहम्मद पैगंबरांच्या सर्व पत्नींचा दर्जा हा ''समस्त मुस्लीम समाजाच्या माता'' हा आहे.

त्या सर्व अर्धांगिनींमधील 'हजरत आयेशा (रजि.)'विषयी ह्या पुस्तकात माहिती देण्यात आलेली आहे, नव्हे हा ''आयेशा'' ह्या श्रेष्ठ पत्नीचा चरीत्रग्रंथ आहे. हजरत आयेशाचं सर्व पत्न्यामध्ये एकट्या कुमारीका होत्या, बाकी सर्वजणी एकतर विधवा होत्या किंवा तलाक पिडित.

ह्या श्रेष्ठ ज्ञानी उच्च आचरणसंपन्न स्त्रीविषयी माहिती गोळा करून ती मुद्देसूदपणे ठेवणे, हे सोपे नव्हते. परंतु डॉ. इ.जा. तांबोळी यांनी हे महत्वपूर्ण तसेच अवघड काम फारच उत्कृष्टपणे केले आहे. त्यासाठी त्यांची कितीही प्रशंसा केली तरी कमीच आहे. ह्या छोट्याशा चरित्रग्रंथाचे वैशिष्ट्य म्हणजे तिची सोपी, साधी भाषा होय. अत्यंत सोप्या भाषेत मांडणी करण्यात आलेली आहे. ऐतिहासिक लिखाण करताना संदर्भ आवश्यक असतात, ते येथे आढळत नाहीत. पण त्यामुळे वाचकांना कोणतीही अडचण येणार नाही, असे मला व्यक्तिशः वाटते.

डॉ. इ.जा. तांबोळी यांचे कार्य मराठी भाषिकासाठी मौल्यवान भेट आहे आणि त्याचे समाजातील सर्व स्तरातून स्वागत होईल अशी आश आहे.

त्यांच्या या कार्याबद्दल शुभेच्छा आणि हे पुस्तक सर्व पसंतीस उतरो, हीच सर्व शक्तिमान अल्लाहचरणी हीच प्रार्थना!

– मा.काझी शफिकुर रहमान

सोलापूर.

१ । दोन्ही जगातील प्रकाश

मुहम्मद पैगंबर (सल्ल.) यांच्या बालपणातील जीवनापासून अखेरपर्यंत सारे जीवन नीतिनियमानी भरलेले आहे. सुरवातीला मुहम्मद पैगंबरानी शेळीपालन केले. अल्लाहने प्रत्येक नबीकडून शेळ्या-मेंढ्या चारण्याचे व पालन पोषणाचे काम करून घेतले आहे. हजरत खुदेजतुल कुबरा (रजि.) यांच्यापासून व्यापाराला सुरूवात झाली. हजरत खुदेजतुल कुबरा याना मुहम्मद पैगंबराविषयी माहिती होती. पैगंबराचे सारे जीवन अतिशय सभ्य होते. त्यांना अशा पवित्र व नेक माणसाची गरज होती. खुदेजतुल कुबरा यानी मुहम्मद पैगंबराना निरोप पाठविला की आपला माल इजिप्तला घेऊन गेल्यास आपणाला इतरापेक्षा जास्त नफा देईन. या काळात महम्मद पैगंबर आपले काका अबुतालिब यांच्याकडे राहत होते. हजरत मुहमद पैगंबरानी हजरत खुदेजतुल कुबरा यांचा प्रस्ताव मान्य केला (व्यापाराला जाताना आपला गुलाम मुसैरा याला सोबत पाठविले. पैगंबरांची सेवा करण्यासाठी त्याला सूचना दिली.)

मुहम्मद पैगंबर (सल्ल.) यांच्या इमानदार व प्रेमळ स्वभावामुळे सारे सामान दुप्पट किमतीत विकले गेले. मुहम्मद पैगंबर आपल्या सर्व

साथीदाराशी प्रेमाने वागले. काफिला परदेशातून स्वदेशी परतला. व्यापाराची पद्धत, पैगंबराची वागणूक व व्यापारात झालेला फायदा याची माहिती मुसैरा या गुलामाकडून खुदेजतुल कुबरा याना मिळाली. हे ऐकून खुदेजतुल कुबरा यांच्या मनात मुहम्मद पैगंबराविषयी आस्था व जिव्हाळा निर्माण झाला. या अगोदर खुदेजतुल कुबरा याना एक स्वप्न पडले होते. ते स्वप्न असे होते की आकाशातून चंद्र येऊन यांच्या ओटीत पडलेला आहे. याचा प्रकाश सर्वदूर पसरलेला आहे. आपल्याला पडलेल्या स्वप्नाचा खुलासा खुदेजतुल कुबरा यानी एका पंडितासमोर केला. त्या पंडिताने उत्तर दिले की हे अरबस्तानातील नेक महिला तुला आता ही खुशखबरी आहे की मसिहाने जन्म घेतलेला आहे. तो तुझ्याशी लग्न करणार आहे. हे ऐकून खुदेजतुल कुबराचे मन आनंदविभोर झाले. हुजूर (स्व.) यांना लग्नाचा प्रस्ताव पाठविला. पैगंबराने हा प्रस्ताव स्वीकारल्यानंतर हजरत खुदेजा (रजि.) याने आपले काका उमरोबिन असद याना बोलावून घेतले.

मुहम्मद पैगंबर (सल्ल.) यानी आपले काका अबू तालीब व आपल्या परिवारातील लोकाना सोबत घेऊन हजरत खुदेजतुल कुबरा यांच्या घरी गेले. हजरत अबू तालीब यांनी लग्नाचा खुतबा पठण केले. पाचशे दीरहम महेर निश्चित केला गेला. लग्नविधी पार पडला. यावेळी मुहम्मद पैगंबरांचे वय फक्त पंचेवीस वर्षे होते. हजरत खुदेजतुल कुबरा यांचे वय चाळीस होते.

मुहम्मद पैगंबरांशी लग्न झाल्यानंतर हजरत खुदेजतुल कुबरा यानी पंचवीस वर्षे संसार केला. पंचवीस वर्षे हयात राहिले. याना सहा अपत्ये झाली. पहिल्यांदा कासीम यांचा जन्म झाला व त्यांचे चार वर्षातच निधन झाले. अब्दुल्ला, जैनब, रूकय्या, उम्मे कुलसूम, फातिमा अशी ही मुले होती. अब्दुला यांचे वयाच्या दुसऱ्या वर्षातच निधन झाले. हजरत खुदेजतुल कुबरा यानी आपल्या मुलांचे पालनपोषण मोठ्या आनंदाने केले. पंचवीस वर्षापर्यंत संसार केल्यानंतर वयाच्या पासष्टाव्या वर्षी हजरत खुदेजतुल कुबरा यांचे निधन झाले. रमजानच्या महिन्यात मक्का या शहरात त्यांचे निधन झाले. मुहम्मद पैगंबरानी त्यांचा दफनविधी मक्का येथे

जन्नतुलमुआला येथील कब्रस्तानात पार पाडला. आपल्या पवित्र हाताने पैगंबराने हजरत खतिजतुल कुबरा यांचे पार्थिव कबरीत ठेवले.

हजरत खुदेजतुल कुबरा जोपर्यंत जिवंत होत्या, तोपर्यंत पैगंबरानी दुसरा विवाह केला नाही. मात्र आपल्या जीवनात वेगवेगळ्या कारणानी पैगंबरानी दहा विवाह केले. विधवा विवाहाला सुरवात, गरीब, नादाराशी लग्न, दोन खानदानातील शत्रूत्व नाहीसे करण्यासाठी विवाह केले. आपापसात प्रेम व समझोता करण्यासाठी प्रेषितानी दहा विवाह केले.

मुहम्मद पैगंबर (सल्ल.) यानी दहा लग्न केल्याबद्दल विनोबा भावे यानी आपली प्रतिक्रिया व्यक्त केलेली आहे. ते म्हणतात की हजरत मुहम्मद पैगंबर साहेबांनी दहा विवाह केले. त्याचा अर्थ ते भोगी आहेत असा नाही. पैगंबर साहेब महान विभुती होते. त्यांचे नाव ऐकले की मला समाधी लागते. अशीही प्रतिक्रिया मुस्लीमेत्तर बांधवांनी प्रकट केलेली आहे. हजरत खुदेजतुल कुबरा यांच्या निधनानंतर मुहम्मद पैगंबर सतत निराश दिसत होते. त्यानंतर हजरत आयशा (रजि.) यांच्याशी पैगंबरांचा विवाह झाला. हजरत आयशा हयात असतानाच हजरत सौदा (रजि.) देखील पैगंबरांच्या जीवनात आल्या. हजरत आएशा (रजि.) यांच्याशी लग्न झाल्यानंतर त्या साडेतीन वर्षांपर्यंत आपल्या आई वडिलांकडेच होत्या. त्यावेळी हजरत सौदा (रजि.) पैगंबराच्या घरी होत्या. आएशा (रजि.) जेव्हा पैगंबराच्या घरी आल्या तेव्हा घरात हजरत सौदा (रजि.) होत्या.

***

२ । हजरत आएशा सिद्दिका (रजि.)

हजरत अब्दुल्ला (रजि.) हजरत आएशा यांचे भाचे होते. हजरत आस्मा (रजि.) यांचे चिरंजीव होते. हजरत अब्दुल्ला 'अब्दुल्ला बिन जुबेर' या नावाने प्रसिद्ध होते. हजरत आएशा यांना मूलबाळ नव्हते. अरबस्तानात कुळाला महत्त्वाचे स्थान आहे.

आएशा (रजि.) याना मूल नसल्याने त्यांना मुहम्मद पैगंबरानी सांगितले की इतर स्त्रियानी मूलबाळ नसल्याने काही मुलाना दत्तक घेऊन आपला वंश सांभाळलेला आहे. मी आपला वंशज म्हणून कोणाला स्वीकारू, असा प्रश्न आएशा यानी प्रेषितांना विचारला. मुहम्मद पैगंबराने सुचविले की अब्दुल्ला याना आपला वंशज म्हणून अब्दुल्ला यांचा स्वीकार करावा. त्या दिवसापासून अब्दुल्ला याना आपला वंशज म्हणून आएशाने स्वीकार केला.

हजरत आएशा यांच्या वडिलांचे नाव अब्दुल्ला आहे. अबूबकर हे वंशजाचे नाव असून सिद्दिक ही पदवी आहे. आएशा यांच्या आईचे नाव उम्मे रोमान होते. वडिलाकडून आएशा अबूबकर सिद्दिक व आईकडून आएशा बिन्त उम्मे रोमान बिन्न आमीर आहे. याप्रमाणे हजरत आएशा

वडिलाकडून कुरैशिया व आईकडून किनानया ह्या कबिल्याच्या आहेत.

हजरत उम्मे रोमान (रजि.) यांचा पहिला विवाह अब्दुल्ला अजदी यांच्याशी झाला. यांच्या मृत्युनंतर उम्मे रोमान याने अबूबकर (रजि.) यांच्याशी विवाह केला. त्याना अ. रहेमान व हजरत आएशा (रजि.) ही दोन मुले झाली. हजरत आएशा (रजि.) यांची जन्मतारीख निश्चितपणे सांगू शकत नाही. हजरत आएशा (रजि.) यांचे स्थान इस्लाममध्ये अढळ आहे.

बालपणात हजरत आएशा (रजि.) खेळण्यात अतिशय दंग असत गल्लीतील लहान मुले त्यांच्या भोवताली गोळा होत होती. लहान मुली सतत त्यांच्याबरोबर खेळत असत. लहानपणी मुहम्मद पैगंबरांना पाहून त्या आपल्या बाहुल्या लपवीत असत. आएशा बरोबर खेळणाऱ्या मुली लपत असत. हुजूर त्या मुलीना बोलावून खेळण्यासाठी सांगत. सर्व खेळात हजरत आएशा याना झोका व बाहुल्यांचा खेळ अतिशय आवडीचा होता.

विशेषत: लहानपणी मुलाना हाच खेळ आवडत असतो. सात आठ वर्षांपर्यंत कोणतीच जाणीव लहान मुलाना होत नसते. कोणत्याही गोष्टीला लहान मुले समजत नाहीत. हजरत आएशा (रजि.) यांनी आपल्या बालपणातील सर्व गोष्टी लक्षात ठेवल्या होत्या. लहानपणी खेळताना एखादी कुरआनची आयत कानावर पडली तर आठवणीत ठेवत. त्या म्हणतात की, ही आयत मक्केत ज्यावेळी अवतरली त्यावेळी मी खेळत होते. या बालवयातील सर्व घटना स्मरणात होत्या. हिजरतच्या समयी तमाम घटना त्यांच्या आठवणीत होत्या. त्याना सोडून कोणत्याही सहकाऱ्याने त्यावेळी घडलेल्या घटना स्मरणात ठेवलेल्या नाहीत.

हदीसमध्ये काही गोष्टी आलेल्या आहेत, हजरत आएशा (रजि.) यांच्याशी विवाह करण्यापूर्वी पैगंबरांना एक स्वप्न पडले. या स्वप्नात देवदूत रेशीमच्या कपड्यात लपेटून कोणतीतरी वस्तू देत आहे. हुजूरने विचारले हे काय आहे? त्या देवदूताने उत्तर दिले की ही तुमची पत्नी आहे. लपेटून दिलेला रेशीमचा कपडा काढून पाहिल्यानंतर त्यात हजरत

आएशा यांचा फोटो होता. बालपणात झालेला हा विवाह प्रेषित व राजकीय जीवनाला जोडणारा दुवा होता. अरबस्तानातील उष्ण वातावरणाने माणसांची वाढ जलद होते. त्यांची बौद्धिक क्षमता कुशाग्र होती. मुहम्मद पैगंबर यानी महेरमध्ये पाचशे दिरहम दिले. लग्नानंतर हजरत आएशा तीन वर्षापर्यंत आपल्या आई वडिलांकडे राहिल्या. दोन वर्षे त्या मक्का येथे होत्या. हिजरत केल्यानंतर त्या एक वर्षापर्यंत मदिनेत होत्या. मदिनेत साथीचा आजार पसरला. बरेच लोक आजारी पडले. अबूबकर याना खूप ताप आला. हजरत आएशा (रजि.) आपल्या वडिलांच्या सेवेत मग्न होती. हजरत आएशा (रजि.) यांनी ही बातमी मुहम्मद पैगंबर याना सांगितली. पैगंबराने आजारातून मुक्ती मिळण्यासाठी प्रार्थना केली. यानंतर हजरत आएशा (रजि.) स्वतः आजारी पडल्या. या आजारात डोक्यावरील सारे केस गळाले. काही दिवसानी पुन्हा ती बऱ्या झाल्या.

हजरत अबूबकर यानी मुहम्मद पैगंबर याना विचारले की तुम्ही आपल्या पत्नीला घरी का घेऊन जात नाही? पैगंबराने सांगितले का आता माझ्याकडे महेर अदा करण्यासाठी पैसे नाहीत. अबूबकर यांनी विचारले की माझी संपत्ती आपल्याला कबूल आहे. अबूबकर यांच्याकडून पाचशे रुपये उधार घेतले. हे पैसे हजरत आएशा (रजि.) यांच्याकडे पाठविले. महेर हा स्त्रिचा हक्क आहे. तो देण्यासाठी टाळाटाळ करू नये.

मदिना हे हजरत आएशा (रजि.) यांचे सासर होते. अन्सारच्या स्त्रिया नवरीला घेऊन जाण्यासाठी अबूबकर यांच्या घरी आल्या. हजरत उम्मे रोमान याने आपल्या मुलीला आवाज दिला. त्यावेळी हजरत आयेशा (रजि.) आपल्या मैत्रिणीसह झोका खेळत होत्या. आईचा आवाज ऐकून त्या घाबरत घाबरत आल्या. आईने मुलीला सावरले. वेणीफणी केली. खोलीत बसलेल्या त्या अन्सारच्या महिलाकडे आएशाला घेऊन गेल्या. सर्वांनी कौतुकाने हजरत आएशाचे (रजि.) स्वागत केले. थोड्यावेळाने मुहम्मद पैगंबर पण तेथे आले. फक्त दुधाशिवाय तेथे कोणताच पदार्थ पाहुण्याना द्यायला नव्हता. हजरत आस्मा बीन यजीद (रजि.) ही हजरत आएशा (रजि.) यांची मैत्रीण होती. पैगंबराने एका

प्याल्यातील दूध पिऊन तो प्याला आएशा याना दिला. त्या लाजल्या. त्या लाजत तो दुधाचा प्याला घेतला. थोडेसे दूध आएशाने प्राषण केले.. प्रेषितानी सांगितले की बाकी दूध आपल्या मैत्रिणीना दे. त्यावेळी मैत्रिणीनी भूक नसल्याचे सांगितले. प्रेषित म्हणाले, खोटे बोलू नका. माणसाची एक एक खोटी गोष्ट लिहिली जाते.

हजरत आएशा (रजि.) ज्यावेळी ती आपल्या घरातून हुजूर यांच्याकडे जाताना शव्वाल महिन्याची पहिली तारीख होती. वरील बाबीवरून असे दिसून येते की हजरत आएशा (रजि.) यांचा विवाह व इतर विधी किती साध्या व सोप्या होत्या. कोणताही गाजावाजा नव्हता.

शिक्षण व प्रशिक्षण

अरबस्तानात पुरुष लिहित व वाचत नव्हते. मग स्त्रियांची परस्थिती कशी असेल? ज्या वेळी इस्लामचा बोलबाला झाला त्यावेळी कुरैशी कबिल्यात फक्त सत्तर माणसे लिहित-वाचत होती. त्या पुरुषात फक्त शिफा बिन्त अब्दुल्ला ही एकच नारी होती. इस्लामच्या इतिहासात ही एक महत्त्वाची घटना आहे. इस्लाम दाखल झाल्यानंतर लिहिण्या-वाचण्याची परंपरा सुरू झाली. बदरच्या युद्धकैद्यात ज्याना लिहिता वाचता येते अशा कैद्याना प्रेषितानी दहा मुलाना लिहिणे, वाचणे शिकविण्याचा दंड दिला. सुफ्फातील शंभर असहाब होते. त्याना पण इतर शिक्षणाऐवजी लिहिणे वाचणे शिकविले जात होते.

पैगंबराच्या पत्नी हजरत हफसा (रजि.) यानी मुहम्मद पैगंबर (सल्ल.) यांच्या आदेशानुसार लिहिणे वाचणे शिफा बिन्त अब्दुल्ला अदलिया यांच्याकडे शिकल्या. अशी संधी इतर स्त्रियाना मिळालेली नाही.

हजरत आएशा (रजि.) यांच्याशिवाय इतर विधवा स्त्रीया प्रेषितांच्या जीवनात आल्या. लहानपणीच शिक्षणाला सुरवात झाली होती. प्रकाश बनून या जगातील अंधार दूर करायचा होता. हजरत अबूबकर शेर व शायरीत ख्यातनाम होते. आपल्या मुलांच्या शिक्षणावर त्यांचे लक्ष होते. लग्नानंतरही हजरत आएशा (रजि.) आपल्या वडिलाना भीत होती.

कित्येक वेळा अबूबकर याने हजरत आएशा (रजि.) याना ताकीद दिली होती.

हजरत आएशाचे (रजि.) शिक्षण हे पैगंबरांच्या घरी गेल्यानंतर सुरू झाले. याच काळात लिहिणे वाचणे शिकल्या. कुरान शरीफ पाहून वाचत होत्या. काही कथनात अशी नोंद आहे की काही पत्राना हजरत आएशा (रजि.) यांनी उत्तर दिलेले आहे. लिहिणे वाचणे हे गरजेचे आहे. धर्मातील महत्त्वाच्या बाबी, शरियतची माहिती, प्रेषितांचे ज्ञान हे देखील उच्च शिक्षण आहे. हजरत आएशा (रजि.) खास करून ध्यानात ठेवत होत्या. याशिवाय इतिहास, वैद्यकीय ज्ञान इत्यादी बाबी हजरत आएशा (रजि.) यांना ज्ञात होत्या. हे सारे शिक्षण त्याना त्यांच्या वडिलाकडून मिळाले होते.

प्रेषितांच्या सानिध्यात हजरत आएशा (रजि.) यांनी वैद्यकीय शिक्षण प्राप्त केले. प्रेषित शेवटच्या काळात सतत आजारी असत. अरबस्तानातील वैद्य व हकीम जी औषधे सांगत होते. ती औषधे पाठ करून ठेवत होत्या. धर्माचे ज्ञान शिकणे हे काही अवघड नव्हते. घरात प्रेषितच होते. हुजूर अकरम (स्व.) शिक्षण व प्रशिक्षणाची सुरवात मस्जीद ए नबवीत करीत असत. हजरत आएशा यांच्या घरापासून हे अंतर अतिजवळ आहे. याशिवाय प्रेषित बाहेरच्या लोकाना पण शिक्षण देत होते. या वेळी आएशा सहभागी होत होत्या. जर एखादी गोष्ट समजली नाही तर त्या स्वत: दुसऱ्यांदा विचारत होत्या. आपल्या मनातील शंका प्रेषिताना विचारत असत. स्त्रियांच्या शिक्षणासाठी आठवड्यातून एक दिवस प्रेषितांचा निश्चित होता.

रात्रंदिवस असंख्य प्रश्न हजरत आएशा (रजि.) यांच्या कानावर पडत होते. कोणताही प्रश्न निर्माण झाला की त्या लगेच प्रेषिताना सांगत होत्या. आपले समाधान झाले की मग त्या शांत बसत होत्या. एकदा हजरत आएशाने (रजि.) प्रेषिताना प्रश्न विचारला की जमीन व आकाश नव्हते तर माणसे कोठे राहत होती?

माणसे सिरात वर राहत होती असे उत्तर प्रेषितानी दिले. (सिरात म्हणजे पूल) कयामत ज्या दिवशी असेल त्या दिवशी माणसे नग्न

उठतील. हजरत आयेशा (रजि.) प्रश्न विचारला की पुरुष व स्त्रिया एकाच ठिकाणी असतील का? एकमेकांची नजर उठणार नाही का? ही वेळ अतिशय नाजूक असणार आहे. कोणलाही कोणाची खबर असणार नाही. यादिवशी प्रत्येकाच्या कर्माचा फैसला होणार आहे.

हजरत आयेशा (रजि.) यानी प्रेषिताना प्रश्न विचारला की कयामतच्या दिवशी एकमेकाना आठवण करू शकतो का? प्रेषितानी फर्माविले की तीन वेळा अशा असतील की कोणीही कोणाची आठवण करू शकणार नाही. १) माणसानी केलेल्या कर्माचा हिशोब ज्या वेळी सुरू आहे. २) आपण केलेल्या कर्माचा हिशोब देताना ३) नरक गरजून गरजून सांगते की मी अशा या प्रकारच्या लोकांसाठी आहे. अशा या तीन प्रसंगी कोणीही कोणाचीही आठवण करू शकत नाही. अब्दुल्ला बिन ही व्यक्ती अतिशय प्रामाणिक व पवित्र मनाची होती. हे मक्का येथे राहत होते. यानी कुरैश जमातीच्या लोकाना एकत्रित आणून एक चांगली संघटना तयार केली होती. त्यामध्ये स्वत: प्रेषित जात होते. तो गरिबाना अन्नदान करीत होता. असे केल्याने काही फायदा होईल का? असे आएशा यांनी प्रेषिताना विचारले. प्रेषितानी उत्तर दिले की आएशा काहीही फायदा होणार नाही. कारण या माणसाने हे परमेश्वरा माझ्या चुकाना माफ कर असे कधीच म्हटलेले नाही. परमेश्वरासमोर कधीच माफी मागितली नाही.

जिहाद

इस्लामचा मुख्य उद्देश आहे की स्त्री व पुरुष यांच्यात भेदभाव नाही. एकेदिवशी आएशा (रजि.) यानी प्रेषिताना प्रश्न विचारला की जिहाद स्त्रियाना पण आहे का? स्त्रियानी हज यात्रा केल्याने त्यांचा जिहाद पूर्ण होतो. असे प्रेषितानी सांगितले. लग्नासाठी मुलीचा होकार असावा. लग्नासाठी ती लाजते व गप्प बसते. म्हणजेच तिचा लग्नाला होकार आहे. इस्लाममध्ये शेजाऱ्यांचे देखील काही कर्तव्ये आहेत. शेजाऱ्यांशी जास्त संबंध स्त्रियाशी येतो. दोन शेजारी आहेत तर महत्त्व कोणाला द्यायचे हा प्रश्न हजरत आएशा (रजि.) यानी प्रेषिताना विचारला. ज्या शेजाऱ्याचा दरवाजा तुमच्या घराजवळ आहे त्या शेजाऱ्याला मान व

महत्त्व द्या. असे प्रेषितानी सांगितले.

एकदा हजरत आएशा (रजि.) यांचे चुलत काका भेटण्यासाठी आले. हजरत आएशा (रजि.) यानी त्यांची भेट घेतली नाही. या वेळी प्रेषितांचे आगमन झाले. प्रेषित म्हणाले ते तुझे काका आहेत त्याना तू घरात बोलव. याप्रमाणे सारे जीवन प्रश्न व उत्तरानी भरलेले होते. त्यामुळे आपल्या मानवी जीवनाला प्रेरणा व मार्गदर्शन मिळणारे आहे.

हजरत आएशा (रजि.) सतत प्रेषिताना प्रश्न विचारत होत्या. त्या कधीच गप्प बसत नव्हत्या. कधी कधी प्रेषिताना राग येत असे. एकदा अशी घटना घडली की रागाने प्रेषित म्हणाले की मी आता एक महिनाभर मी तुमच्याशी बोलणार नाही. अशा प्रकारे अठ्ठावीस दिवस झाले. एकोणतीसाव्या दिवशी प्रेषित हजरत आएशा (रजि.) याना भेटण्यासाठी भेटले. योगायोग असा होता की तो महिना एकोणतीस दिवसांचा होता. एक महिना मी तुम्हाला भेटणार नाही असे प्रेषित म्हणाले होते. हजरत आएशा (रजि.) यानी विचारले की अजून एक महिना झाला नाही. एक दिवस तुम्ही अगोदर बोलतात. प्रेषित म्हणाले, आएशा महिना एकोणतीस दिवसांचा आहे.

अरबस्तानातील खेडेगावात राहणाऱ्या लोकाना इस्लामचे रीतीरिवाज माहित नव्हते. एकदा अशी घटना घडली की संबला या खेडेगावातील महिलांनी प्रेषिताना दूध आणून दिल्या. यावेळी हजरत अबूबकर सोबत होते. प्रेषित व अबूबकर या दोघानी दूध प्राषन केले. हजरत आएशा (रजि.) यानी विचारले की आपण या लोकानी आणलेले पदार्थ खात नाही. आज तुम्ही दूध पिलात.

ज्यावेळी त्याना मी बोलवितो त्यावेळी ते येतात. यासाठी मी त्यांचे दूध पित आहे. प्रेषित तहज्जूदच्या नमाजनंतर वितरची नमाज पठण करून झोपत होते.

प्रेषिताना हजरत आएशा (रजि.) यानी अनेक प्रश्न विचारल्याने गुह्य बाबींची माहिती मिळाली. हजरत आएशा (रजि.) यांच्या प्रत्येक हालचालीवर प्रेषितांची नजर होती. जेथे चुकते तेथे प्रेषित मार्गदर्शन करीत

असत.

एकदा प्रेषितांकडे काही ज्यू आले होते. ते ज्यू 'अस्सलाम अलैक' असे न म्हणता 'अस्साम अलैक' असे म्हणाले. याचा अर्थ असा होतो की तुम्हाला मृत्यू येवो. हे सारे हजरत आएशा (रजि.) ऐकत होत्या. त्या म्हणाली, 'अलैकुम साम और लानत' म्हणजे 'तुझा मृत्यू व तुझा तिरस्कार' असे म्हणाल्या. हे ऐकून प्रेषित म्हणाले, आएशा माणसात नरमी हवी. अल्लाह माणसातील नरमीला पसं त करतो. हजरत आएशा (रजि.) यांची कोणतीतरी वस्तू कोणीतरी चोरलेली होती. हजरत आएशा (रजि.) यानी त्या चोराला शाप दिला. प्रेषित म्हणाले, शाप देऊन आपला चांगलेपणा कमी करू नका. असा मनाचा मोठेपणा प्रेषितांनी शिकविला.

प्रवासात हजरत आएशा (रजि.) प्रेषितासोबत उंटावर बसून जात होत्या. उंटाने जरा गती घेतली. इतर स्त्रियाप्रमाणे हजरत आएशा (रजि.)च्या तोंडात उंटाविषयी तिरस्कारीत शब्द आले. प्रेषिताना हे आवडले नाही. उंट जर पसंत नसेल तर तो परत करा. उंटाविषयी वाईट बोलणे प्रेषिताना पसंत नव्हते. कोणतीही स्त्री लहान सहान बाबींचा विचार करीत नाही. लहान-सहान वा मामूली गुन्ह्यापासून आपला बचाव करून घ्या. परमेश्वर आपल्याला या सर्व गुन्ह्याविषयी विचारणा करणार आहे. एकदा प्रेषिताशी हजरत आएशा (रजि.) गप्पा मारीत होत्या. बोलता बोलता एका महिलेचा विषय निघाला. हजरत आएशा (रजि.) त्याना म्हणात्या की ती महिला बुटकी आहे. प्रेषित लगेचच हजरत आएशा (रजि.) याना ताकीद दिले की त्या महिलेची उंची कमी आहे. असे म्हणणे म्हणजे त्याची निंदा आहे. कोणाचीही निंदा करणे गुन्हा आहे.

हजरत साफिया (रजि.) यांची उंची कमी होती. ती प्रेषिताना म्हणाली की साफिया (रजि.) एवढीच आहे. साफिया (रजि.) तू अशी गोष्ट सांगितली की निंदा समुद्राच्या पाण्यात जर आपण मिसळलो तर समुद्राचे पाणी कडवट होईल. निंदा करू नका. हाच संदेश प्रेषितानी दिलेला आहे.

एकदा हजरत आएशा (रजि.) यांच्या घरासमोर भिकारी आला. हजरत आएशा (रजि.) यांनी आपल्या घरातील काम करणाऱ्या बाईला इशारा केला. त्या बाईने थोडासा पदार्थ देण्यासाठी घेतला. प्रेषित हजरत आएशा याना म्हणाले की तू कोणतीही वस्तू मोजून तोलून देऊ नको. परमेश्वर तुला मोजून मोजून देईल. आपल्याकडे खजुराचा एकच तुकडा असेल तर तो पूर्ण त्याला द्या. नरकाच्या आगीपासून स्वत:ला मुक्त करा व स्वःताला वाचवून घ्या. एक़दा प्रेषितांनी परमेश्वराकडे प्रार्थना केली. हे अल्लाह! माझ्यातील गरिबी जिवंत ठेव. मला गरिबीतच मृत्यू दे. या गरिबाबरोबर मला कयामतच्या दिवशी उठव. हजरत आएशा (रजि.) प्रेषिताना विचारल्या की अशी दुवा तुम्ही का करता? प्रेषितानी उत्तर दिले की गरिबाना कधीच रिकाम्या हाताने पाठवू नको. आपल्या घरातील खजुराचा एक तुकडा का होईना दे. गरिबावर प्रेम कर. त्याना आपल्याजवळ जागा द्या. त्यांच्यावर माया करा.

खानदानी गृहस्थी

हजरत आएशा (रजि.) ज्या घरातून त्या आपले माहेर सोडून आल्या होत्या तर इथे काही मोठा बंगला वा इमारत नव्हती. मस्जीद नबवीच्या आजूबाजूला लहान लहान हुजरे होते. (हुजरा- तात्पुरते राहण्यासाठी लहानसे घर) यातील एक हुजरा हजरत आएशा (रजि.) यांचा होता. मस्जीद नबवी या हुजऱ्यांचे अंगण बनले होते. हुजूर (स्व.) याच दरवाजाने दाखल होत होते. हुजऱ्याची लांबी जास्तीत जास्त दहा फूट होती. भिंत मातीची होती. खजुराच्या फांद्या व पाने याच्याने छत बनविलेले होते. वरून कांबळ पांघरलेली होती. पावसापासून संरक्षण व्हावे हा हेतू होता. उभे राहिल्यानंतर छताला हात लागत होते. दरवाजात एक पराचा दरवाजा होता. तो कधीच बंद नव्हता. परदा म्हणून एका कांबळ्याचा वापर केलेला होता. हुजऱ्याला लागून सुरवातीला एक खोली होती. याच खोलीत प्रेषित बसत असत.

एकूण संपत्ती

घरात एक कॉट, एक चटई, एक अंथरूण, एक उशी व त्यात सालपट भरलेली होती. पीठ व खजूर ठेवण्यासाठी दोन मातीचे गाडगे. पाणी पिण्यासाठी एक मातीचा प्याला. मातीचे एक ताट. दिवा लावणे कठीण होते. चाळीस चाळीस रात्री अशा गेल्या की घरात दिवा लावला नव्हता. घरात फक्त तिघेच होते. या घरात प्रेषित, हजरत आएशा (रजि.) व हजरत सौदा (रजि.) राहत होते. त्यांचे वय झाल्यानंतर सारी जबाबदारी हजरत आएशा (रजि.) यांच्यावर आली. प्रेषित नऊ दिवसांपैकी दोनच दिवस हजरत आएशा (रजि.) यांच्याकडे राहत होते.

घरातील खर्च भागविण्याकरीता जास्त कष्टाची जरूरी नव्हती. खूप कमी वेळा जेवण तयार करण्याची पाळी यायची. हजरत आएशा (रजि.) म्हणते की प्रेषितांनी कधीच पोट भरून जेवण केले नाही. महिना महिना घरात चूल पेटत नव्हती. सुकलेले खजूर व पाणी पिऊन गुजराण करीत होते. खैबरचे युद्ध जिंकल्यानंतर प्रेषितानी आपल्या पत्नीना घरखर्च करण्यासाठी काही रक्कम वर्षासाठी निश्चित केली. मात्र दानशूर स्वभाव असल्याने हा माल वर्षभर पुरत नव्हता.

मुहम्मद पैगंबर (सल्ल.) यांचे सहकारी प्रेमापोटी काही वस्तू भेट म्हणून पाठवीत होते. खास करून प्रेषित हजरत आएशा (रजि.) यांच्याकडे आले की लोक भेटवस्तू पाठवित होते. प्रेषित घरी येऊन विचारत असत की आएशा काही आहे का? रसूल अल्लाह (स्व.) काहीही नाही. असे उत्तर आएशा (रजि.) देत होत्या. त्यादिवशी रोजा होत होता. कधी अन्सारचे लोक दूध पाठवीत असत. त्यावरच गुजराण होई.

निसर्गाकडूनच मनाचा मोठेपणा निर्माण झालेला होता. लहानसे वय, भूल-चूक होत होती. घरात पीठ मळून ठेवलेले होते. तशीच झोप लागली. शेळी येऊन ते पीठ खाऊन गेली. एकेदिवशी हाताने दळण दळून लहान लहान भाकऱ्या तयार केल्या. हुजूर (स्व.) येण्याची वाट पाहू लागल्या. रात्रीची वेळ होती. प्रेषित नमाज पठण करण्यात मग्न होते. हजरत आयेशा (रजि.) झोपी गेल्या. शेजारची एक शेळी आली व सर्व

भाकऱ्या खाऊन गेली. हजरत आएशा (रजि.) याना इतर स्त्रियाप्रमाणे चांगल्याप्रकारे स्वयंपाक जमत नव्हता.

अबूबकर सिद्दिक (रजि.) यांच्या काळात निश्चित केलेले धान्य खैबरमधून दोन वेळा मिळत होते. हजरत उमर (रजि.) यांच्या काळात सर्वांना पेन्शन निश्चित केलेली होती. हजरत आएशा (रजि.) याना बारा हजार रुपये मिळत होते. हजरत उमर (रजि.) यांच्या काळात त्यानी हजरत आएशा (रजि.) याना जमीन किंवा धान्य घेण्यास स्वातंत्र्य दिले. त्यावेळी हजरत आएशा (रजि.) यानी जमीन घेतली. या जमिनीतून आलेले उत्पन्न गरिबाना वाटत होत्या. हजरत उस्मान (रजि.), हजरत अली (रजि.) व आमीर माआविया (रजि.) यांच्या काळातही हीच पद्धत रूढ होती. आमीर माआविया (रजि.) यांच्यानंतर हजरत अब्दुल बिन जुबैर (रजि.) हे खलिफा झाले. हे हजरत आएशा (रजि.) यांचे भाचे होते. त्यांनी आपल्या मावशीच्या खर्चाची जबाबदारी घेतली. ज्या दिवशी पेन्शन येत होती, त्याच दिवशी रात्री उपाशी झोपावे लागत होते.

घरगुती जीवन

स्त्रियाविषयी युरोप व इतर देशात विरोधी वातावरण होते. स्त्री ही उपभोगाची वस्तू आहे. काही देशात स्त्रीला परमेश्वर समजत होते. स्त्रीची मर्जी म्हणजे, अल्लाहची मर्जी. अशारीतीने स्त्रियाविषयी मतमतांतरे होती. स्त्रिला ईश्वराचे स्थान नाही वा आपल्या जीवनातील काटा पण नाही. असा इस्लाममध्ये समज आहे. प्रेषित मुहम्मद पैगंबर म्हणतात की 'तुमच्या जीवनात ही घटना चांगली आहे की तुम्ही तुमच्या पत्नीसाठी चांगले आहात. हजरत आएशा (रजि.) यांचे वैवाहिक जीवन फक्त नऊ वर्षाचे ठरले. या काळात प्रेषित व हजरत आएशा (रजि.) यांच्यात कधीच तक्रार वा नाराजी घडलेली नाही. सतत प्रेम व आपापसात हमदर्दी कायम राहिली. कितीतरी वेळा उपाशीपोटी झोपावे लागले. कधीच तक्रार वा तंटा निर्माण झाला नाही. आनंदाने, हसतमुखाने संसारातील कटू प्रसंगाना सावरून घेतले.

पत्नीशी माया

हुजूर (स्व.) हजरत आएशा (रजि.) यांच्यावर अतीव प्रेम करीत होते. हे साऱ्या साहबीना माहित होते. काही लोक भेटवस्तू पाठवीत होते. सर्वांनी मिळून हजरत फातिमा (रजि.) याना आपली कन्या म्हणून कबूल केले. शेवटी सर्वांनी मिळून उम्मे सलमा (रजि.) याना मध्यस्थी केले. ती अतिशय समजुतदार होती. उम्मे सलमाने संधी पाहून प्रेषितासमोर अगोरदचा विषय मांडला. प्रेषित म्हणाले की मला हजरत आएशा (रजि.) यांच्या बाबतीत त्रास देऊ नको. कारण की हजरत आएशा (रजि.) यांच्याकडे असतानाच अल्लाहकडून मला वह्य उतरली. इतर पत्नीकडे असताना अल्लाहकडून 'वह्य' उतरली नाही.

एकदा कुणीतरी मौल्यवान हार प्रेषिताना भेट दिला. मी हार अशा व्यक्तीला देईन की मला ती सर्वात प्रिय असेल. प्रेषितानी दागिने वा इतर मौल्यवान वस्तूंचा संग्रह कधीच केलेला नाही. तो मौल्यवान हार प्रेषितानी आपली नात हजरत जैनब (रजि.) यांची मुलगी उमामाला दिले. हजरत उमर बिन आस (रजि.) यानी प्रेषिताना विचारले की आपण या जगात सर्वात प्रिय कोणला समजता? प्रेषित उतरले की आएशा (रजि.) याना मी सर्वात प्रिय समजतो. पुन्हा एक प्रश्न असा विचारला की पुरुषात सर्वात प्रिय कोण आहे? प्रेषित उत्तरले की हजरत आएशा (रजि.) यांचे वडिल मला प्रिय आहेत. एकेदिवशी हजरत उमर (रजि.) यांनी हजरत हफसा (रजि.) याना समजावले की हजरत आएशा (रजि.) यांच्याबरोबर स्पर्धा करू नको. ती हुजूर (स्व.) यांची प्रिय पत्नी आहे. एकेदिवशी हजरत आएशा (रजि.) प्रवासात असताना ज्या उंटावर बसलेल्या होत्या. तो उंट बिथरला व एकीकडे पळाला. प्रेषित हे पाहून परेशान झाले नि म्हणाले, 'हाय माझी वधू'! एकदा प्रेषित बाहेरून घरात आले. हजरत आएशा (रजि.) यांचे डोके दुखत होते. त्याना वेदना होत होत्या.

प्रेषित पुन्हा पुन्हा विचारीत होते की आज कोणता दिवस आहे? लोकांनी समजून घेतले की हजरत आएशा (रजि.) यांची आठवण प्रेषिताना येत आहे. प्रेषितांना लोकांनी हजरत आएशा (रजि.) यांच्या घरी घेऊन

गेले. आपला देहांत होईपर्यत ते तेथेच राहिले. हजरत आएशा (रजि.) यांच्या मांडीवरच आपला शेवटचा श्वास घेतला. हजर आएशा (रजि.) अती सुंदर होत्या. म्हणून प्रेषित त्यांच्यावर अतीप्रेम करीत होते. असा समज होणे चुकीचे आहे. प्रेषितांच्या इतर पत्नीपैकी हजरत जैनब (रजि.), याही अती सुंदर होत्या. हजरत आएशा (रजि.) यांच्याशी स्पर्धा करू नको. कारण, ती अतिशय सुंदर आहे व प्रेषिताना प्रिय आहे. हे म्हणणे ऐकून प्रेषित हसले. स्वत: आएशा (रजि.) यांचे म्हणणे असे आहे की प्रेषित म्हणाले. लग्न करताना स्त्रिच्या चार गुणांचा विचार व्हावा. १) संपत्ती २) सुंदरता ३) खानदान ४) नैतिकता ह्याचा शोध घ्या. हजरत आएशा (रजि.) सर्व बाबी ध्यानात ठेवीत होत्या. अनेक बाबी त्यांना तोंडपाठ होत्या. धार्मिकतेत त्या सर्वात पुढे होत्या. त्यामुळेच त्या प्रेषिताना आवडत होत्या. इतर पत्नीपेक्षा त्या सरस होत्या. स्वत: प्रेषितांचे असे मत होते की पुरुषांमध्ये अनेक सक्षम पुरुष आहेत. मरियम बीन इमरान व फिरऔनची पत्नी आसिया याशिवाय कोणीही सक्षम स्त्री झालेली नाही. आएशा (रजि.) यांचे स्थान अतिशय महनीय आहे.

पतीशी प्रेमाची वागणूक

हजरत आएशा (रजि.) यांचे प्रेषितावर अतिशय प्रेम होते. रात्री अचानक उठल्यानंतर बाजूला प्रेषित नसायचे. त्यामुळे त्या अतिशय बेचैन होत होत्या. त्या काळात घरात दिवा नव्हता. एकदा रात्री अचानक जाग आली. त्या अंधारात चाचपडू लागल्या. त्यांच्या हाताला प्रेषितांचा पाय लागला.

प्रेषित नमाज पठण करीत होते. एकदा अचानक अशीच घटना घडली. हजरत आएशा (रजि.) याना वाटले की प्रेषित आता दुसऱ्या पत्नीकडे गेले, असतील. त्या इकडे तिकडे पाहू लागल्या. प्रेषित ध्यानमग्न दिसले. आपली चूक त्याना समजली. मी वेगळाच विचार करीत होते. प्रेषित वेगळ्याच जगात आहेत. असे शब्द त्यांच्या मुखातून बाहेर पडले.

एकदा रात्री घडलेली ही घटना आहे. हजरत आएशा (रजि.) याना

जाग आली. अर्धी रात्र सरली होती. घरात प्रेषित दिसत नव्हते. इकडे-तिकडे त्या शोधू लागल्या. त्याना शोधत शोधत कब्रस्तानमध्ये गेल्या. तेथे प्रेषित प्रार्थना करण्यात मग्न होते. सरळ त्या घरी परतल्या. सकाळी या घटनेचा तपशील प्रेषितानी हजरत आएशा (रजि.) याना सांगीतला.

एकदा प्रवासात हजरत आएशा (रजि.) व हजरत साफिया (रजि.) या दोघी प्रेषितासोबत होत्या. रात्रीच्या समयी प्रेषित हजरत आएशा (रजि.) यांच्याशी गप्पा गोष्टी करीत होत्या. काफिला चालत होता. एके दिवशी हजरत साफिया (रजि.) म्हणाल्या की आपण आता उंटाची अदला बदल करू रात्र झालेली होती. नेहमीप्रमाणे प्रेषित हजरत आएशा (रजि.) यांच्या उंटाकडे गेले तर तेथे हजरत साफिया (रजि.) होत्या. प्रेषित सलाम करून बसले. इकडे आएशा (रजि.) याना राहवले नाही.

मुहम्मद पैगंबर (सल्ल.) यानी पक्का इरादा केला की एका महिन्यापर्यंत कोणत्याच पत्नीशी बोलायचे नाही. बाहेर हुजऱ्याच्या वर मजला होता. तेथेच ते मुक्काम करीत होते. प्रेषित पत्नी दु:खात होत्या. प्रेषितांच्या मर्जीशिवाय ते त्याना भेटू शकत नव्हते. हजरत आएशा (रजि.) दररोज दिवस मोजत होत्या. एक महिना संपल्यानंतर प्रेषित सरळ खोलीत आले. प्रेषितांच्या पत्नीत श्रीमंत घराण्यातील मुली होत्या. अमीर व उमराव व श्रीमंतांच्या मुली होत्या. असे फकिराचे जीवन गुजरणे त्याना मान्य नव्हते. जो या इज्जतीला कबूल करतो त्यानी प्रेषिताशी एकरूप व्हावे. ज्याना नको वाटते त्यानी बाजूला व्हावे. प्रेषितांची कोणतीही पत्नी त्याना सोडून गेली नाही. सर्वांनी हे फकिराचे जीवन मोठ्या आनंदाने स्वीकारले.

शेवटच्या जमान्यात 'रिजा'ची आयत अवतरली. या पत्नीना प्रेषिताने ठेवावे अथवा न ठेवावे. प्रेषितानी आपल्या कोणत्याही पत्नीला दूर केले नाही. हा अधिकार जर मला मिळाला असता तर मी फक्त श्रेय व सन्मानात कोणाचाही समावेश केला नसता. असे हजरत आएशा (रजि.) म्हणतात. मोता युद्धात हजरत जाफर तय्यार (रजि.) हे शहीद झाल्याची बातमी आली. एका साहबीने ही खबर दिली, जाफर यांच्या घरातील

स्त्रिया अतिशय दु:ख प्रकट करीत आहेत. प्रेषितांनी आदेश दिला की त्याना दु:ख प्रकट करण्यासाठी मनाई करा. ते सहाबी गेले व परत आले. सहाबीने सांगितले की दु:ख करण्याचे थांबविले नाही. प्रेषितानी फर्माविले की ते सहाबी पुन्हा गेले व परतले. नि काही सांगू लागले. हजरत आएशा (रजि.) दरवाजाच्या आड थांबून हे सारे ऐकत होत्या. बेचैन होत होत्या.

पत्नीचा सन्मान

हजरत हुजूर अकरम (स्व.) यांचे जीवन म्हणजे सर्वांनी मिळून मिसळून वागण्याचा महान संदेश होता. पतीने आपल्या पत्नीच्या आनंदासाठी अनेक प्रयत्न करायला हवेत. हजरत आएशा (रजि.) यानी एका अन्सारच्या मुलीचे पालन पोषण केले होते. त्या मुलीच्या लग्नावेळी अतिशय साधेपणा अवलंब केला.

एक दिवस ईदचा होता. ईदच्या दिवशी निग्रो भाले हलवून हलवून पैलवानी कसरती दाखवीत होते. हजरत आएशा (रजि.) याना हा तमाशा पहावा असे वाटू लागले. प्रेषित हे पाहण्यासाठी थांबले व त्याच्या पाठीमागे हजरत आएशा (रजि.) थांब ल्या. प्रेषित स्वत: कोणाला दिसू नये असे उभे राहिले. एकदा हजरत आएशा (रजि.) वरचढ करून प्रेषितांना काही सांगत होत्या. इतक्यात योगायोगाने अबूबकर तेथे आले. त्यांना इतका राग आला की ते आपल्या मुलीला मारण्यासाठी गेले. प्रेषितांनी तात्काळ अडविले. हजरत अबूबकर निघून गेले. प्रेषित म्हणाले की, आएशा (रजि.) मी तुला कसे वाचविले. असा मनाचा मोठेपणा प्रेषिताकडे होता.

पत्नीचे मन रिजविणे

प्रेषित कधी कधी आपल्या पत्नीचे मन रिजविण्यासाठी गोष्टी सांगत असत. एकदा या गोष्टीत खराफाचे नाव आले. खराफाला ओळखते का? असे विचारले. खराफा हा उमरा कबिल्याचा माणूस होता. त्याला

जिन्नतानी उचलून घेऊन गेले होते. तेथे त्यांनी आश्चर्यचकित करणाऱ्या वस्तू पाहिल्या. परत आल्यानंतर आश्चर्यचकीत करणाऱ्या गोष्टी सांगू लागला. तेव्हापासून कोणीही अशा आश्चर्यजनक घटना सांगितल्या की लोक म्हणायचे की ही तर खराफाची गोष्ट आहे.

अनुकरण

पत्नीचे पहिले कर्तव्य हे आहे की पतीचा शब्द मानावा. हजरत आएशा (रजि.) यानी नऊ वर्षाचे जीवन प्रेषितासमवेत घालविले. प्रेषितांच्या आदेशाचे पालन केलेले आहे. कधीच विरोध केला नाही. इशाऱ्याने पण जर प्रेषित नापसंती दर्शवीत असतील तर लगेच त्या वस्तू सोडून देत होत्या. एकदा हजरत आएशा (रजि.) यानी मोठ्या आनंदाने सुंदर नक्षीकाम केलेला पडदा दारावर लावला. प्रेषित घरात प्रवेश करताना त्यांची नजर त्या नव्या पडद्यावर पडली. चेहऱ्यावर नाराजी पसरली. हे पाहून हजरत आएशा (रजि.) गपचूप झाल्या. प्रेषितांची त्यानी माफी मागीतली. प्रेषित म्हणाले की ज्या घरात फोटो आहेत त्या घरात देवदूत येत नाहीत. हे ऐकून हजरत आएशा (रजि.) यानी तात्काळ तो दरवाजावर लावलेला पडदा काढून टाकला. ते कापड त्यानी दुसऱ्या कामासाठी वापरले. एका साहबीला लग्नानंतरचे स्नेहभोजन (वलिमा) करायचे होते. घरात सामान नव्हते. हे प्रेषिताना समजले. प्रेषितानी हजरत आएशा याना सांगितले की त्या साहबीच्या घरात अन्नाची टोपली नेऊन द्या. हे ऐकून हजरत आएशा (रजि.) आपल्या पतीचा शब्द अंतिम मानून हजरत आएशा (रजि.) यानी अन्नाची टोपली तात्काळ दिली. याचाच अर्थ असा होतो की आपल्या घराचा विचार न करता आपल्या पतीचा शब्द अंतिम मानला.

हजरत आएशा (रजि.) यानी प्रेषिताना जिहादची परवानगी मागीतली. प्रेषिताने सांगितले की स्त्रियानी हज यात्रा केली की त्याना जेहादचे पुण्य मिळेल. हजरत आएशा (रजि.) यानी आपल्या जीवनात अनेक वेळा हजयात्रा पूर्ण केल्या. अराफतच्या मैदानात जिलहजच्या महिन्यात (हजच्या यात्रेसमयी) नऊ व दहा तारखेला रोजा करावा लागतो. त्यावेळी हजरत

आएशा (रजि.) यानी रोजा केला. त्यावेळी अरबस्तानात खूप उष्णता होती. डोक्यावर पाणी शिंपडून घ्यावे लागत होते. कुणीतरी सल्ला दिला की रोजा सोडा. हजरत आएशा (रजि.) यानी रोजा तोडण्यास नकार दिला. अराफतच्या मैदानात रोजा केल्यास वर्षभरातील गुन्हे परमेश्वर माफ करतो. हे मी प्रेषिताकडून ऐकले आहे. मी रोजा सोडू शकत नाही. असे हजरत आएशा (रजि.) म्हणाल्या.

मिळून मिसळून जीवन

हजरत आएशा (रजि.) यांचे घर पैगंबराचे आरामाचे स्थान होते. येथे कोणत्याही प्रकारची सत्ता वा संपत्ती नव्हती. हजरत आएशा (रजि.) फर्मावितात की प्रेषित म्हणत असत की आदमच्या मुलांच्या मिळकतीत माल व दौलतचे मैदान भरलेले आहेत. ईर्षा केली तर त्याचे तोंड मातीनीच भरून पूर्ण होईल. परमेश्वर म्हणतो की संपत्ती माझी आठवण करण्यासाठी व गरिबाची मदत करण्यासाठी निर्माण केलेली आहे. जो अल्लाहकडे येईल. त्याच्याकडे अल्लाह जाईल.

प्रेषित मुहम्मद पैगंबर रात्रीची नमाज अदा करून हुजऱ्यात प्रवेश करीत असत. दात स्वच्छ करून तात्काळ झोपी जात. रात्री उठून पुन्हा तहज्जूदची नमाज पठण करीत. रात्रीच्या तिसऱ्याप्रहरी शेवटच्या घटकेला हजरत आएशा (रजि.) याना उठवीत. त्या पण त्यांच्याबरोबर नमाज पठण करीत असे. वितरची नमाजपण पठण करीत असे. दिवस उजाडल्यावर प्रेषित सकाळची नमाज पठण करीत होत्या. सकाळची नमाज झाल्यानंतर हजरत आएशा (रजि.) यांच्याशी चर्चा करीत असत. त्यानंतर ते बाहेर पडत. कधी कधी रात्रभर अल्लाहची प्रार्थना व ध्यान करीत होते. हुजूर (स्व.) आले इम्रान, सूर ए बकरा, इत्यादी मोठाली सूरते पठण करीत होते. अल्लाहची भीती निर्माण करणारी आयत आली की ते क्षमा मागत होते.

अल्लाहची भीती निर्माण करणारी आयत आली तर ते माफी मागत होते. कधी स्वप्नात काही संदेश आला तर त्याची प्रशंसा करीत असत.

प्रेषित मस्जीदीत नमाज पठण करताना हजरत आएशा (रजि.) आपल्या हुजऱ्यात तसा अंमल करीत असत.

पाच वेळेची नमाज अदा करणे. प्रेषिताना पाहून चाश्तची नमाजपण हजरत आएशा (रजि.) अदा करीत असत. सहसा ते रोजे करीत. प्रेषित व आएशा दोघे मिळून रोजे करीत होते. रमजानच्या महिन्यात शेवटच्या दहा दिवसात प्रेषित मस्जीदीत एतेकाफला बसत होते. हजरत आएशा (रजि.) आपल्या घरात एतेकाफ करीत असे. मस्जिदीच्या आवारात एक छोटासा तंबू मारलेला होता. सकाळची नमाज अदा करून प्रेषित त्या तंबूत थोडावेळ येऊन बसत होते. सन अकरा हिजरीत हजरत आएशा (रजि.) प्रेषिताबरोबर हज यात्रेला गेल्या होत्या. हज व उमरा हे दोनही करण्याची मनिषा होती. तवाफ करताना त्याना थोडासा त्रास झाला. तेव्हा त्या खूप नाराज झाल्या होत्या. हे पाहून प्रेषितानी हजरत आएशा (रजि.) यांचा भाऊ अ. रहेमान बिन अबूबकर यांच्या बरोबर जाऊन बाकी विधी पूर्ण केले.

घरातील कर्तव्ये

प्रेषित व हजरत आएशा (रजि.) यांच्यातील प्रेमभाव आपण पाहिलेला आहे. अजान झाल्यानंतर प्रेषित घरातून तत्काळ बाहेर पडत. आमच्याशी बोलायचे सोडून बाहेर पडत असत. आम्हाला ते ओळखत पण नव्हते. घरात आल्यानंतर त्यांचा साधेपणा पहायला मिळे. ईश्वराने विटा आणि मातीच्या सजावटीसाठी आपल्याला संपत्ती दिलेली नाही. असे प्रेषित म्हणायचे. एके रात्री प्रेषित हजरत आएशा (रजि.) यांच्याकडे गेले. गुपचूप उठून दुसरीकडे रवाना झाले. हजरत आएशा (रजि.) त्यांच्या पाठीमागे गेल्या. प्रेषित कब्रस्तानात जाऊन प्रार्थना करीत होते. हजरत आएशा (रजि.) लपून तेथेच उभे राहिल्या. घरी परतत असताना प्रेषितानी आएशाला पाहिले. हजरत आएशा (रजि.) पटकन घरी आल्या. प्रेषिताने विचारणा केली. लपून छपून शोध घेण्यास मनाई आहे असे सांगितले.

एकदा एका यहुदीने प्रेषिताना शाप दिला होता. हजरत आएशाने

(रजि.) त्याला रागाने उत्तर दिले होते. अल्लाह मेहरबान आहे. तो नरमीला पसंत करतो. रेशीम आणि सोने इस्लाममध्ये फक्त स्त्रियाना वापरण्याची परवानगी दिलेली आहे. जगातील ऐश आराम अशा भौतिक गोष्टी प्रेषिताना आवडत नव्हत्या. अती शृंगारपण प्रेषिताना आवडत नव्हते. एकदा हजरत आएशा (रजि.) यानी आपल्या हातात सोन्याच्या बांगड्या नेसल्या होत्या. प्रेषित म्हणाले की, ह्या बांगड्या काढून टाक. चांदीच्या दोन बांगड्या घे. त्यावर जाफरनचा रंग याने पिवळा रंग चढव. अशा बांगड्या वापरा असे सांगितले.

हजरत आएशा (रजि) ह्या सांगतात की प्रेषितानी पाच गोष्टींना मनाई केली होती. रेशमी कपडे, सोन्याचे दागिने, सोन्याचांदीचे भांडी, लाल रंगाच्या नरम उशी व कतान (कतान म्हणजे भारी सूत) पासून बनवलेले रेशमी कपडे या गोष्टीना प्रेषितानी नकार दिलेला आहे. एकदा आएशा (रजि.) प्रेषिताना विचारल्या की, थोडे सोने वापरले तर चालेल का? प्रेषिताने नकार दिला. चांदीला जाफरानचा रंग देऊन वापरा असा साधेपणा प्रेषितांनी आपल्या जीवनात स्वीकारला.

एकदा हजरत आएशा (रजि.) यांनी बनविलेल्या भाकऱ्या शेजारची शेळी येऊन फस्त केली. यावर प्रेषित म्हणाले की, शेजारच्या व्यक्तीना काही बोलू नको. अरबस्तानात घोरपडीचे मटण खाण्याची प्रथा होती. एकदा कुणीतरी घोरपडीचे मटण प्रेषितांना खाण्यासाठी पाठवून दिले. प्रेषित हे मटण जेवले नाहीत. मी हे मटण गरीबाला देऊ का? असा प्रश्न हजरत आएशा (रजि.) यानी प्रेषिताना विचारला. प्रेषित म्हणतात की मला हे खाणे आवडत नाही तर इतराना पण देऊ नका.

हजरत आएशा (रजि) यांच्या विवाहानंतर अरबस्तानातील तीन वाईट प्रथांना तिलांजली मिळाली.

अरब लोक शव्वालच्या महिन्यात लग्नकार्य करीत नव्हते. हजरत आएशा (रजि) यांचे लग्न शव्वालच्या महिन्यात झाले. शव्वालचा महिना अशुभ आहे अशी समजूत अरब लोकात होती. इस्लामने हे दाखवून दिले की कोणताही महिना वाईट नाही.

अरबस्तानात भावाच्या मुलीशी लग्नाची मनाई होती. हजरत अबुबक्र (रजि) हे प्रेषित मोहमद पैगंबर यांचे मानलेले बंधू होते. हजरत आएशा (रजि) यांचा विवाह वडिलांच्या मानलेल्या भावाशी झाला. हे निश्चित झाले की आपल्या मानलेल्या भावाशी आपल्या मुलीचे लग्न करू शकतो.

लग्न झाल्यानंतर नवरी नवऱ्याच्या घरी जात असताना रस्त्यात आग लावली जात असे या विधीपाठीमागे अंधश्रद्धा होती. हजरत आएशा (रजि) यांच्या लग्नाने ही प्रथा रद्द झाली.

हजरत आएशा (रजि) असे म्हणतात की, ''माझ्या लग्नात अशा कोणत्याच गोष्टी घडलेल्या नाहीत. मी खूप नशीबवान आहे, या गोष्टी न केल्याने मला कोणताच त्रास झालेला नाही. परमेश्वराची कृपा आहे.''

***

३ । सहनशक्तीची मूर्ती

स्त्री या जगातील प्रत्येक गोष्टीला सहन करते. पुरुषांचा जुलूम सहन करते. भूक, तहान अशा प्रत्येक गोष्टीला ती सहन करते. संयम कधी सोडत नाही. अनेक यातना सहन करते. मात्र स्त्रीला कधीच सवत मान्य होत नाही. ती कधीच सवत मान्य करत नाही. अनेक पुस्तकात वा ग्रंथात असे म्हटले आहे की सवत ही अत्यंत कडवट वस्तू आहे. सवत म्हणजे खूप मोठे चॅलेंज आहे, असे स्त्री समजते. कधी कधी सवत म्हणजे आपल्यासाठी धोका समजते.

हजरत आएशा (रजि.) यानी आठ सवत सोबत आपले जीवन जीवन व्यतीत केले. सतत प्रेम व हमदर्दीमध्ये जरासाही फरक पडला नाही. हजरत खुदेजा (रजि) यांच्या मृत्युनंतर हुजूर अकरम (स्व.) याने वेगवेगळ्या सबबीने अकरा लग्न केले. हजरत जैनब (रजि) यांच्याशी तीन हिजरीत निकाह झाला होता. हजरत जैनब (रजि.) दोन ते तीन महिने जिवंत होती. बाकीच्या नऊ पत्नी प्रेषित हयात असेपर्यंत जिवंत होत्या.

हजरत खुदेजा (रजि.) आएशाच्या काळात जिवंत नव्हती. हजरत मुहम्मद पैगंबर (सल्ल.) यांच्या मनात सदैव हजरत खुदेजा (रजि.) यांची

आठवण कायम होती. पैगंबर (स्व.) नेहमी आएशा समोर खुदेजाच्या आठवणी सांगत असत. हजरत आएशा (रजि.) असे म्हणते की हजरत खुदेजा (रजि.) यांची आठवण हुजूर करतात. तशीच आठवण माझी सुद्धा करावी. जी इज्जत वा प्रेम खुदेजा याना मिळाले ते मला पण मिळावे, असे हजरत आएशा (रजि.) याना वाटते. प्रेषित वर्षातून एकदा कुरबानी देत असत. आपल्या जवळच्या लोकाना काही भेटवस्तूपण देत होते. हजरत खुदेजा (रजि.) यांची भूमिका प्रेषिताच्या जीवनात महत्त्वाची आहे. इस्लामला सुरवात होण्याअगोदर प्रेषिताना सल्ला देणे, संकटात साथ देणे, इत्यादी दृष्टिने खुदेजाने केलेली कामगिरी अनन्य साधारण आहे.

हजरत आएशा (रजि.) यांचे लग्न झाल्यानंतर तीन वर्षांपर्यंत त्या माहेरी होत्या. त्या काळात हजरत सौदा (रजि.) प्रेषितांच्या घरी होत्या. सन एक हिजरीमध्ये आएशा (रजि.) प्रेषितांच्या घरी आल्या. त्या दोघात अत्यंत चांगले संबंध होते. हजरत आएशा (रजि.) घरी आल्यानंतर दोन चार वर्षांनी हजरत सौदा (रजि.) त्या थकल्या होत्या. त्यानी प्रेषितांची सारी जबाबदारी हजरत आएशा (रजि.) यांच्यावर सोपविली. आनंदाने हजरत सौदा (रजि.) एकटी राहत होती. हजरत सौदा (रजि.) यांचा स्वभाव थोडासा कडक होता.

हजरत हफसा (रजि) सन तीन हिजरी मध्ये प्रेषितांच्या जीवनात दाखल झाली. आठ वर्षांपर्यंत ती हजरत आएशा (रजि.) यांच्यासोबत राहिली. या दोघात अतिशय प्रेमाचे संबंध होते. घरातील कारभार दोघांच्या विचारानेच होत होता. या दोघी एकमेकांची काळजी करीत असत. हजरत आएशा (रजि.) यांच्यानंतर हजरत उम्मे सलमा (रजि.) ही प्रेषितांच्या सर्व पत्नीपेक्षा श्रेष्ठ होती. 'हुदैबिया चा तह' येथील कुरबानीच्या वेळेला त्यानी प्रेषिताना सल्ला दिला होता. हा सल्ला स्त्रियांच्या इतिहासात आठवण म्हणून राहील. हजरत आएशा (रजि.) यांच्यानंतर हजरत उम्मे सलमा (रजि.) यांचा दर्जा आहे. हजरत आएशा (रजि.) यांच्यापेक्षा उम्मे सलमा (रजि.) वयाने मोठ्या होत्या. प्रेषित नेहमी उम्मे सलमाची स्तुती करीत होते. हजरत आएशा (रजि.) व हजरत उम्मे सलमा (रजि.) याना

दूत म्हणून पाठविले. प्रेषिताना हे सांगावे की भेटवस्तू प्रेषित जेथे असतात, तेथेच पाठवाव्यात. हजरत आएशा (रजि.) यांच्याकडे असताना भेटवस्तू पाठवू नयेत. असा सांगावा देऊन हजरत उम्मे सलमा (रजि.) याना पाठविले. हा सांगावा घेऊन ती प्रेषितासमोर दाखल झाली. मोठ्या अदबीने आपले म्हणणे सादर केली. प्रेषिताने उत्तर दिले. ती शांत झाली. हजरत आएशा (रजि.) यानी हे सारे ऐकून देखील नाराजी प्रकट केल्या नाहीत.

हजरत जवेरिया (रजि.) यांच्याशी कोणीही विरोध केला नाही. ती स्वत:च्या सौंदर्यावर घाबरली. इतर प्रेषित पत्नीदेखील अतिशय रूपवान होत्या. कदाचित आपण थिटे आहोत की काय? अशी शंका हजरत जवेरिया (रजि.) यांच्या मनात निर्माण झाली होती. हाही समज चुकीचा ठरला. आपल्या वैयक्तिक सौंदर्याचा परिणाम आपल्या जीवनात त्यानी कधीच होऊ दिला नाही. हजरत जैनब बिन जहश (रजि.) ही प्रेषितांच्या आत्याची मुलगी होती. अतिशय स्वाभिमानी होती. स्वभाव अतिशय कडक होता. पहिले लग्न झाले होते. अशा स्वभावाने पहिला पती सोडावा लागला. प्रेषितांशी तिचे दुसरे लग्न झाले. दरम्यानच्या काळात ती प्रेषितांशी अती जवळची होती. ती नेहमी मी इतरापेक्षा खूप इज्जतदार आहे असे स्वत:ला समजत होती. हजरत आएशा (रजि.) म्हणतात की इतरापेक्षा हजरत जैनब बिन जहश (रजि.) यानी माझ्याबरोबर सतत संघर्ष केला.

रमजानच्या महिन्यात प्रेषित शेवटच्या दहा दिवसात एतेकाफला बसत होते. हजरत आएशा (रजि.) मस्जीदच्या आवारात तंबू मारून एतेकाफ करीत होती. काही कामानिमित्त प्रेषित आएशाकडे येत असत. इतर प्रेषित पत्नी हे पाहून पुढील वर्षाच्या रमजान महिन्यात तंबू मारण्यासाठी हजरत हफसा (रजि.) यानी प्रेषिताना परवानगी मागितली. प्रेषितानी उपासना करण्यासाठी परवानगी दिली. हे सारे हजरत जैनब (रजि.)ने ऐकले. त्यानी पण आपला एक तंबू उभा केला. सकाळी उठून प्रेषित पाहतात तर अनेक तंबू दिसू लागले. प्रेषितानी माहिती घेतली. या सर्वांनी आपल्या मनातल्या प्रेमापोटी असे केले आहे. सर्व तंबू काढून टाकले.

एकदा रात्रीच्या समयी हजरत जैनब (रजि.) हजरत आएशा (रजि.)

यांच्या घरी आल्या. त्या काळात घरात दिवे लागत नव्हते. अशा अंधारात प्रेषित घरात आले. एका बाजूला ते गेले. हजरत आएशा म्हणाल्या की त्या बाजूला जैनब आहे. असे म्हटल्याने प्रेषिताना राग आला. हजरत आएशा (रजि.) काहीतरी म्हणाल्या. बाहेर मस्जीद नबवीत हजरत अबूबकर (रजि.) होते. त्यानी हा आवाज ऐकला. हजरत अबूबकर (रजि.) घरात आले. प्रेषित घराबाहेर पडले. हजरत आएशा (रजि.) यांची नाराजी पाहून थबकले. त्यांची समजूत काढली व ताकीत दिली.

अशा घटनाना पाहिल्यानंतर असे वाटते की स्त्रियांची मने स्वच्छ नव्हती. जेथे स्त्रिया एकत्र येतात तेथे काहीतरी संघर्ष निर्माण होत असतो. ही तर स्त्रियांचीच खासियत आहे. स्त्री एका पुरुषाला सज्जन माणूस म्हणून उभा करते. मात्र, तिची अवस्था बदलत नाही. स्त्री आपला स्वभाव बदलू शकत नाही. तिच्या प्रेमात इतर कोणी सहभागी होऊ नये अशीच भावना स्त्रीची आहे. येथे हीच परिस्थिती होती. एकाच प्रकाशाची ही सारी किरणे होती. प्रेषितांविषयी प्रेमाचा सागर प्रत्येकाच्या मनात होता. आपापसातील मतभेद दूर करून प्रेषित पत्न्यांशी प्रेम व हमदर्दी बाळगून होते.

हजरत जैनब (रजि.) ज्यावेळी घरात आली तेव्हा हजरत आएशा (रजि.) यानी प्रेषिताना शुभेच्छा दिल्या. मदिन्यातील काही विरोधकानी आवई उठविली. बहिणीच्या प्रेमात हजरत जैनब (रजि.) यांची बहीण हमना बिन्त जहश पण सामील आहे. हजरत आएशा (रजि.) वर पण आरोप करण्यात आले. हजरत जैनब (रजि.) यांचे पाऊल मजबूत होते. हुजूर अकरम (स्व.) याने जैनब याना आएशाच्या बाबतीत विचारले. हजरत जैनब (रजि.) म्हणतात की चांगला स्वभाव व पुण्यकर्म याशिवाय मी हजरत आएशा (रजि.) यांच्यात काहीही पाहिले नाही. अशी स्तुती हजरत जैनब (रजि.) यानी हजरत आएशा (रजि.) यांच्या बाबतीत केली. अशा चांगल्या वागण्याने वातावरण सुंदर बनले. हजरत आएशा (रजि.) यानी सतत हजरत जैनब (रजि.) यांच्या आठवणी जपून ठेवलेल्या होत्या.

एकदा हजरत जैनबने (रजि.) हजरत साफिया (रजि.) याना यहुदी

म्हणून हिणविले. या घटनेने प्रेषित नाराज झाले. दोन महिन्यांपर्यंत प्रेषित बोलले नाहीत. हजरत जैनब (रजि.) एकेदिवशी आएशा यांच्याकडे गेली. तू माझी शिफारस कर. प्रेषितांची समजूत काढली. मी केलेली चूक माफ करायला सांग. अशी विनंती हजरत आएशा (रजि.) यांच्याकडे केली. हजरत आएशा (रजि.) याना एक चांगली संधी मिळाली. प्रेषिताना पटवून सांगून हा मामला संपवून टाकला.

माणूस मृत्यू पावला की त्याच्या चांगल्या व वाईट गुणांची चर्चा होत असते. मेलेल्या माणसाविषयी चांगलेच बोलावे, वाईट बोलू नये. हजरत आएशा (रजि.) याने आपल्या सवती विषयी हीच भूमिका अवलंब केली. एकदा प्रेषित म्हणाले की कोणाचा हात लांब आहे. त्यानी मला सगळ्यात अगोदर येऊन भेटावे. मग हे ऐकून सर्व प्रेषित पत्नी आपापल्या हाताचे माप घेत होते. नंतर समजले की हाताची लांबी प्रेषिताने का मोजली. जो आपल्या हाताने काम करतो. स्वकष्टाने संपत्ती जमा करतो. ती संपत्ती गोरगरिबात वाटून टाकतो. यालाच लांब हात म्हणतात. हजरत जैनब (रजि.) अशाप्रमाणे वागत होती. ती दानशूर होती. हाताची लांबी म्हणजे दानशूर असणे. हा अर्थ जैनबच्या मृत्युनंतर सर्वांना समजला. हजरत जैनब (रजि.) व हजरत आएशा (रजि.) यांच्यात थोडीशी नाराजी निर्माण झाली. तरीपण हजरत आएशा (रजि.) जैनबची स्तुती करतात. जैनब सारखी दानशूर, प्रामाणिक, नेक स्त्री मी आजपर्यंत पाहिलेली नाही. तिचा स्वभाव फक्त कडक होता. खूप लवकर तिला आपली चूक समजत होती. ती खूप मनमोकळ्या स्वभावाची होती. हे बोल जैनबविषयी हजरत आएशा (रजि.) यांचे आहेत. हा मनाचा मोठेपणा येथे दिसून येतो.

हजरत उम्मे हबीबा (रजि.) व हजरत आएशा (रजि.) यांच्यात संघर्ष झाला होता. हबीबा (रजि.) यांनी मृत्युपूर्वी हजरत आएशा (रजि.) याना बोलावून घेतली. सवतीत काहीशी तक्रार होत असते. आपल्या दोघात काही संघर्ष झाला असेल तर त्याला अल्लाह आपल्या दोघाना माफ करो. हजरत आएशा (रजि.) पण अल्लाह सर्वांना माफ करो असे म्हणाल्या. आता तू मला यावेळी अती आनंदित केली आहेस. अल्लाह

तुला सदैव आनंदी ठेवो. अशा शुभेच्छा उम्मे हबीबा (रजि.) यानी दिल्या.

हजरत मैमूना (रजि.) यांचा मृत्यू झाला, त्यावेळी हजरत आएशा (रजि.) यानी त्यांच्यावर स्तुतीसुमने उधळली. ती आमच्यापेक्षा खूप संयमी होती असे आएशा म्हणाल्या. हजरत साफिया (रजि.) फक्त तीन वर्षे प्रेषितांच्या सोबत होती. ती खैबरची राहणारी होती. यहुदी खानदानातील होती. खैबरमध्येच ती प्रेषितांशी विवाहबद्ध झाली होती. उंटावरून ती मदिनाकडे येत होती. सोबत प्रेषित होते. मदिनाजवळ आल्यानंतर उंटावरील आसनाची दोर सुटली. ते आसनपण तुटले. ती जमिनीवर कोसळली. ही बातमी मदिना शहरात पसरली. लहान मुले-मुली पाहण्यासाठी गर्दी केले. ही घटना घडल्यानंतर हजरत साफिया (रजि.) अपशकून आहे, असे म्हणून काही बाही म्हणाले. मदिना येथील एका अन्सारीच्या घरात हजरत मैमूना (रजि.) याना ठेवण्यात आले. या घटनेमुळे जिकडे तिकडे ही बातमी पसरली. याना पाहण्यासाठी स्त्रियांची गर्दी पडली. या गर्दीत हजरत आएशा (रजि.) पण आल्या होत्या. हजरत आएशा (रजि.) गर्दीत आलेली आहे, हे प्रेषितानी ओळखले. हे पाहून हजरत आएशा (रजि.) लाजल्या व घरी परतल्या. प्रेषित पण घरी गेले. जवळ जाऊन विचारले की तुला कशी वाटते. हजरत आएशा (रजि.) म्हणते की ती यहुदी आहे. आता असे म्हणू नको ती आता 'मुसलमान' झालेली आहे, असे प्रेषित म्हणाले.

हजरत साफिया (रजि.) याना सुंदर स्वयंपाक तयार करता येत होता. स्वत: आएशा त्यानी तयार केलेल्या पक्वानांची स्तुती करीत होत्या. एकेदिवशी दोघानीही प्रेषितासाठी जेवण तयार केले. हजरत साफिया (रजि.) यानी लवकर जेवण पाठविले. हे हजरत आएशा (रजि.) याना आवडले नाही. हजरत आएशा (रजि.) त्या मुलीला रागावल्या. त्या मुलीला मारल्याने हातातील भांडी व त्या भांड्यातील अन्न जमिनीवर पडले नि ती मातीची भांडी फुटली. त्याचे तुकडे इकडे तिकडे पसरले. प्रेषितानी शांतपणे भांड्याचे तुकडे गोळा करू लागले. त्या मुलीला सांगितले

की तुझ्या आईला राग आलेला आहे. थोड्या वेळाने हजरत आएशा (रजि.) याना आपली चूक समजली. आपल्या चुकीची सजा मागण्यासाठी प्रेषिताकडे गेल्या. प्रेषितानी फर्माविले की असाच प्याला व असेच जेवण हजरत साफिया (रजि.) याना परत करा.

हजरत आएशा (रजि.) नेहमी आपल्या सवतीबरोबर न्याय व इज्जतीने वागत होत्या. त्यांच्या चांगल्या गुणांची तारीफ करीत होत्या. कधी कधी माणसाकडून नकळतपणे चुका होत असतात. अशा चुका झाल्यानंतर ती लगेचच तात्काळ समजून दुरूस्ती करीत होत्या. आजकाल सवतीत प्रेम, जिव्हाळा कुठेच दिसून येत नाही. प्रेषितांच्या जीवनात हा आनंद व एकात्मता दिसून येतो.

हजरत खुदेजतुल कुबरा (रजि.) यांच्या चार मुली होत्या. १) हजरत जैनब २) हजरत रूकय्या ३) हजरत उम्मे कुलसूम ४) हजरत फातिमा. हजरत आएशा (रजि.) यायच्या अगोदर घरात फक्त हजरत फातिमा होती. या चार बहिणीपैकी तिघींचे लग्न झाले होते. यापैकी हजरत रूकय्या (रजि.) यांचे सन २ हिजरीमध्ये निधन झाले. यावेळी आएशाला प्रेषिताकडे येऊन एक वर्ष झाले होते. हजरत जैनब व हजरत उम्मे कुलसूम यांचे सन ९ हिजरीत निधन झाले. सात-आठ वर्षेच हजरत आएशा (रजि.) समोर त्या जिवंत होत्या. कधीच आपापसात नाराजी निर्माण झाली नाही. प्रेषितांची सर्वात मोठी मुलगी हजरत जैनब अल्लाहच्या मार्गात शहीद झाली. याबाबतीत प्रेषितांचे म्हणणे हजरत आएशा (रजि.) फर्माविते की जैनब माझी सर्वात चांगली मुलगी होती. प्रेमाने ती मला सतावत होती. हजरत जैनबला एक मुलगी होती. तिचे नाव उमामा होते. प्रेषितांचे या नातीवर खूप प्रेम होते. उमामाला खांद्यावर घेऊन फिरत होते. नमाज पठण करताना तिला खांद्यावर बसवून घेऊनच नमाज पठण करीत होते. नेहमी आपल्या ओटीत घेऊन फिरत होते. हजरत आएशा (रजि.) म्हणतात की, उमामावर प्रेषितांचे अती प्रेम होते. कोणीतरी दिलेला एक मौल्यवान हार आपली नात उमामाला भेट म्हणून दिले. लोकांना वाटत होते की हा मौल्यवान हार हजरत आएशा (रजि.) याना देतील का? असे

घडले नाही.

हजरत आएशा (रजि.) आपल्या माहेरहून प्रेषितांच्या घरी आल्यानंतर हजरत फातिमा (रजि.) या अविवाहित होती. मात्र हजरत आएशा (रजि) यांच्यापेक्षा ती पाच सहा वर्षानी मोठी होती. एक दोन वर्षे आई आणि मुलगी एकत्रित राहिल्या. सन २ हिजरीत हजरत अली मुर्तुजा यांच्याशी हजरत फातिमा यांचा विवाह झाला. लग्नासाठी पवित्र मातानी सारी तयारी केली होती. त्यामध्ये हजरत आएशा (रजि.) पण होत्या. प्रेषितांच्या आदेशानुसार घर विकत घेतले. अंथरूण पांघरूण तयार केले. खजुराच्या झाडापासून उशी तयार केली. खारीक आणि मनुके भोजनासाठी आणले. लाकडाची अलमारी तयार केले. त्यावर पाण्याचा मटका व कपडे अडकविले. फातिमाचे लग्न इतके छान झाले की असे लग्न कोणाचेही झालेले नाही, असे आएशा म्हणतात. आएशा (रजि.) यांच्या घराच्याच बाजूलाच फातिमाचे घर होते. या दोघांच्या घरात फक्त एकच भिंत होती.

हदीसच्या तमाम पुस्तकात हजरत आएशा (रजि.) व हजरत फातिमा (रजि.) यांच्यातील प्रेम व आनंद, जिव्हाळा याचा उल्लेख आलेला आहे. सासरवाडीत काम करून करून हजरत फातिमा (रजि.) थकलेली होती. एखादी मुलगी कामासाठी पाठवा, हे सांगण्यासाठी हजरत फातिमा (रजि.) प्रेषिताकडे आली. यावेळी प्रेषित घरी नव्हते. आपल्या आईला सांगून परत आपल्या घरी आली. हे ऐकून प्रेषित शांत राहिले. हजरत आएशा (रजि.) आपल्या मुलीचे कौतुक करताना म्हणतात की, फातिमा व त्यांच्या वडिलाशिवाय चांगल्या माणसाना कधीही पाहिले नाही. एकदा हजरत आएशा (रजि.) याना विचारण्यात आले की हुजूर अकरम (स्व.) याना सर्वात प्रिय कोण आहेत? आएशा म्हणाली की 'हजरत फातिमा (रजि.).' सर्वात प्रिय आहे.

हजरत आएशा (रजि.) म्हणतात की हजरत फातिमाचे उठणे व बसणे व इतर बाबी प्रेषिताशी जुळत होत्या. हजरत फातिमा (रजि.) जेव्हा आपल्या वडिलांची सेवा करण्यासाठी येत होती तेव्हा प्रेषित उभे राहत

असत. तिच्या कपाळाचा मुका घ्यायचे व आपल्या बसण्याच्या ठिकाणी तिला बसवीत असत. जेव्हा प्रेषित तिच्या घरी गेले तर ती पण उठून उभी राहत असे. वडिलाना बोसा घ्यायची व आपल्या जागेवर बसवीत असे. एकेदिवशी प्रेषितांच्या सर्व पत्नी त्यांच्याजवळ बसलेल्या होत्या. इतक्यात हजरत फातिमाला मोठ्या प्रेमाने आपल्याजवळ बसवून घेतले. हळूच काही कानात सांगितले. ती रडू लागली. हे पाहून प्रेषित अजून काहीतरी कानात सांगितले. तर ती हसू लागली. हजरत आएशा (रजि.) म्हणते की प्रेषिताना काही खास वा विशेष सांगायचे असेल तर ते फक्त फातिमाला सांगतात. फातिमाला सर्वजण विचारले की तुझ्या वडिलानी तुला काय सांगितलेले आहे. फातिमाने हे सांगण्यास नकार दिला. प्रेषितांचे निधन झाल्यानंतर आएशाने पुन्हा एकदा फातिमाला विचारले की, त्या दिवशी तुझ्या वडिलानी तुला काय सांगितले होते, ते मला सांग. हजरत फातिमा (रजि.) म्हणतात की आता सांगायला काही हरकत नाही. त्यादिवशी माझ्या कानात प्रेषितानी आपल्या मृत्युची वेळ जवळ आल्याचे सांगितले होते. मी त्यावेळी रडत होते. मी यासाठी हसत होते की मला जगातील महिलेची सरदार हो, असे सांगितले. यामुळे मी हसत होते. मृत्युचा संदेश दिल्याने मी रडू लागले. या घटनेने हे दिसून येते की आई व मुलीचे संबंध किती गाढ होते हे दिसून येते. आई व मुलीचा प्रेमाचा संबंध या हदीसमधून प्रकट होतो.

हजरत आएशा (रजि.) यांच्या वयाच्या शेवटची ही घटना आहे. वारसा हक्कासाठी यांच्या घरात कधीच संघर्ष झालेला नाही. घरातील किरकोळ नाराजीने कोणाचेही मन दुखलेले नाही. हजरत आएशा (रजि.) व हजरत फातिमा (रजि.) यांच्यात एकच भिंत आड होती. या भिंतीत एक छोटीशी खिडकी होती.या खिडकीतून या दोन्ही मायलेकी कधी क़धी गप्पा मारीत असत. एकदा रात्री प्रेषित घरी नव्हते. याच खिडकीतून त्या रात्री दोघीनी चर्चा केली. हजरत फातिमा (रजि.) यानी ही खिडकी बंद करण्यासाठी आपल्या वडिलाना विनंती केली. पुढे ही खिडकी प्रेषितानी बंद केली.

प्रेषित मोहमद पैगंबरानी अकरा स्त्रियांशी विवाह केला. त्याची पाहिली पत्नी खदिजा (रजि.) ही जोपर्यंत हयात होती. तोपर्यंत त्यानी दुसरे लग्न केले नाही. हजरत खादिजा (रजि) यांच्या मृत्युनंतर दुसरे लग्न केलेले आहे.

उम्मूल मोमिनीन हजरत खादिजा (रह) यांच्या विषयी सर्वांना माहितच आहे की या मक्का येथील सर्वात धनवान व्यक्ती खुवैलद यांच्या कन्या होत्या. स्वतःपण त्या अतिशय श्रीमंत होत्या. त्यांचा खूप मोठा व्यापार होता.

उम्मुल मोमिनीन हजरत सौदा (रजि.) बिन जमआ यांचा संबंध आमिल बिन हुई या काबिल्याशी होता. कुरैशचा हा नामवंत कबिला होता. हजरत सौदा (रजि) याच खानदानातील एका मोठ्या श्रीमंताची मुलगी होती. प्रेषीत मोहमद पैगंबर यांच्याशी त्यांचे लग्न झाले. त्यावेळी त्यांचे म्हातारपण सुरू झाले होते.

उम्मुल मोमिनीन हजरत आएशा (रजि.) पहिले खलिफा हजरत अबुबक्र सिद्दीक (रजि) यांची प्रिय मुलगी होती. यांचे स्थान इस्लामच्या इतिहासात अग्रणी आहे.

उम्मुल मोमिनीन हजरत हफसा (रजि.) दुसरे खलिफा हजरत उमर फारूक (रजि) यांची मुलगी आहे. हजरत उमर फारूक (रजि) यांचे नावच त्यांची ओळख करून देतो.

उम्मुल मोमिनीन हजरत जैनब (रजि.) बिन्त खुजैना, कुरेशी खानदानाच्या होत्या. प्रेषित मोहमद पैगंबर त्यांचे नातेवाईक होते.

उम्मुल मोमिनीन हजरत उम्मे सलमा (रजि.) कुरैश खानदानाच्या होत्या. मखजूम खानदान खूप प्रसिद्ध होते. हजरत खालिद व अबू जहल इत्यादी मान्यवर याच खानदानातील होते. उम्मेसलमा (रजि.) यांचे वडील अबू उमैय्या हे अतिशय श्रीमंत व दानशूर व्यक्ती होते. 'जादुर-राकिब' अशी त्यांना पदवी दिली होती. 'जादूर-राकिब' म्हणजे कबिल्याचा

खर्च स्वतः करणारे हजरत आएशा (रजि.) यांच्यानंतर उम्मे सलमा (रजि.) या अतिशय ज्ञानी व जाणकार होत्या.

उम्मुल मोमिनीन हजरत उम्मे हबीबा, अतिशय श्रीमंत, प्रसिद्ध राजकारणी व मक्काचे सरदार अबू सुफियान यांच्या कन्या आहेत. अबू सुफियान यानी प्रेषितांच्या वाणीवर इस्लाममध्ये दाखल झाले. त्यांनी खूप मोठा त्याग केला.

उम्मुल मोमिनीन हजरत जुवैरिया (रजि.) बिन्त हारिस बनू मुस्तलिक खानदानाच्या सरदाराच्या कन्या होत्या हे खानदान बहादुरीत प्रसिद्ध होते.

उम्मुल मोमिनीन हजरत मैमूना (रजि.) ह्या कुरैश खानदानातील होत्या. त्यांच्या पहिल्या पतीचे निधन झाले. लोकांनी प्रेषिताना सुचविले की हजरत मैमूना (रजि.) यांच्याशी विवाह करावा.

उम्मूल मोमिनीन हजरत साफिया (रजि.) या हजरत हारून (अलै.) यांच्या खानदानातील आहेत. खैबरमधील सरदार हई यांच्या कन्या आहेत. बनू नजीर हा त्यांचा काबिला होता.

या सर्व प्रेषित पत्नी अतिशय श्रीमंत व उंच घराण्यातील होत्या. हजरत आएशा (रजि.) याना दहा सवत होत्या. या सर्व आरशाप्रमाणे स्वच्छ होत्या. या सर्वांची स्तुती हजरत आएशा (रजि.) यांनी वेळोवेळी केलेली आहे.

***

४ । परिस्थितीवर मात

हजरत आएशा (रजि.) यांचे वय फक्त अठरा वर्षे झाले होते. याच काळात प्रेषितांनी आपला शेवटचा प्रवास पूर्ण केला. सन ११ हिजरीच्या महिन्यात प्रेषित हजरत आएशा (रजि.) यांच्या हुजऱ्यात आले. त्यांचे डोके दुखत होते. ते अतिशय बेचैन होते. प्रेषित म्हणाले की, अगर तुझा माझ्यासमोर मृत्यू आला असता तर मी माझ्या हाताने तुझे कफन व निर्भिडपणे तुला दफन केले असते.

असे म्हटल्यानंतर हजरत आएशा म्हणतात की, या हुजऱ्यात आता पुन्हा नवीन पत्नी आणणार आहात का? असे प्रश्न प्रेषिताना विचारतात.

प्रेषितानी स्वतःच्या डोक्यावर हात ठेवून 'हाय मेरा सर' असे म्हटल्यानंतर डोके दुखणे सुरू झाले. हजरत मैमूना (रजि.) यांच्या घरी जाऊन विश्रांती घेतात. एक एक दिवस एका एका हुजऱ्यात मुक्काम करीत होते. प्रत्येक दिवशी विचारत होते की मी उद्या कोठे राहणार आहे? प्रेषित पत्नीनी ओळखून घेतले की? प्रेषिताना हजरत आएशा (रजि.) यांच्याकडे मुक्काम करावयाचा आहे. अल्लाहने हजरत आएशा (रजि.) याना बुध्दी, स्मरणशक्ती, निर्णयक्षमता बहाल केलेली आहे. प्रेषिताना आपला प्रत्येक

शब्द या जगात शिल्लक ठेवायचा होता. आपले म्हणणे वा सांगणे हजरत आएशा (रजि.) यानी इतरांना सांगावे हाच हेतू प्रेषिताचा होता.

आजाराची तीव्रता वाढत होती. नमाज पठण करण्यासाठी जाणे देखील अवघड झाले. सर्वजण त्यांची सेवा करण्यात गुंग होते. हजरत आएशा (रजि.) प्रेषितासाठी दुवा करीत होत्या. फजरच्या नमाजला प्रेषित येण्याची लोक वाट पाहत होते. नमाजला जाण्यासाठी प्रेषित प्रयत्न करू लागले. त्याना उठता येईना कितीतरी वेळा उठण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याना भोवळ येत होती. उठू शकत नव्हते. प्रेषितानी आदेश दिला की हजरत अबूबकर यानी नमाजचे नेतृत्व करावे. प्रेषितांच्या जागेवर एखादी दुसरी व्यक्ती नमाज पठण करण्यासाठी थांबली तर लोक त्याला अपशकून समजतील. हजरत आएशा म्हणते की हजरत अबूबकर कमजोर मनाचे आहेत. हे काम त्याना जमणार नाही. ते रडतील. अजून इतर कोणाला तरी आदेश द्या. प्रेषितानी पुन्हा अबूबकर यांच्याच नावाचा उल्लेख केला. हजरत आएशा (रजि.) यांनी हजरत हफ्सा (रजि.) याना प्रेषिताना सांगा असे सुचविले. शेवटी अबूबकर यांचेच नाव प्रेषितानी घेतले व अबूबकर यानी इमामत केली.

प्रेषित आजारी पडायच्या अगोदर काही सोन्याच्या नाणी हजरत आएशा (रजि.) यांच्याकडे ठेवलेल्या होत्या. त्याना त्याची आठवण आली. त्या सोन्याच्या नाणी कुठे आहेत? असे प्रेषितानी हजरत आएशा (रजि.) याना विचारले. त्या सोन्याच्या नाणी अल्लाहच्या मार्गात खर्च कर. तात्काळ त्या सोन्याच्या नाणी दान करून टाकण्यात आल्या. आता शेवटची वेळ होती. हजरत आएशा (रजि.) प्रेषितांच्या उशीजवळ बसून होती. प्रेषित हजरत आएशा (रजि.) याना टेकून बसले होते. इतक्यात हजरत आएशा (रजि.) यांचा भाऊ अब्दुल रहेमान यानी दात स्वच्छ करण्याचे काडी (मिसवाक) घेऊन आत आला. प्रेषिताना मिसवाक करायचे होते. हजरत आएशा (रजि.) मिसवाक घेऊन आपल्या दातानी त्याला नरम केले. नरम केलेले मिसवाक प्रेषिताना दिले. एका तंदुरूस्त माणसासारखे प्रेषितांनी मिसवाक केले. ही आश्चर्याची घटना होती. हजरत आएशा

(रजि.) म्हणतात की शेवटच्या क्षणी मला प्रेषितांची सेवा करण्याची संधी अल्लाहने दिली आहे.

हजरत आएशा (रजि.) प्रेषितांचा आजार बरा होणेसाठी अल्लाहकडे प्रार्थना करीत होत्या. प्रेषितांचा हात हजरत आएशा (रजि.) यांच्या हातात होता. तात्काळ हात ओढून घेतले. हजरत आएशा (रजि.) म्हणतात की ज्या वेळी प्रेषित तंदुरूस्त होते तेव्हा म्हणत असत. पैगंबराला मरताना दुनिया आणि शेवटच्या समयी कोणाला तरी एकाला कबूल करण्याची परवानगी दिलेली आहे. हे ऐकून हजरत आएशा (रजि.) आश्चर्यचकीत झाल्या. कारण की आता प्रेषित आपल्याला सोडून जाणार हे निश्चित झाले. अशी खात्री हजरत आएशा (रजि.) याना झाली. हजरत आएशा (रजि.) यानी प्रेषिताना विचारले की तुम्हाला खूप त्रास होत आहे का? प्रेषित म्हणाले की, हा त्रास सहन करण्यातच पुण्य आहे.

प्रेषिताना आधार देत हजरत आएशा (रजि) बसलेल्या होत्या. प्रेषितांच्या शरीराचा बोजा जाणवला. डोळयाकडे पाहिले तर डोळे मंदावले होते. हळूहळू त्यांचे डोके उशीवर ठेवले. प्रेषितांचा शेवट हजरत आएशा (रजि.) यांच्या हुजऱ्यात झाला. याच घरात वा हुजऱ्यात प्रेषिताना दफन करण्यात आले.

हजरत आएशा (रजि.) यानी एक स्वप्न पाहिले. या स्वप्नात असे दृश्य होते की त्यांच्या हुजऱ्यात तीन चंद्र तुटून पडले आहेत. या स्वप्नाची चर्चा त्यानी आपले वडील हजरत अबूबकर यांच्याशी केली. त्यावेळी अबूबकर म्हणाले की, पहिला चंद्र आज या हुजऱ्यात दफन झालेला आहे. पुढील काळात हजरत अबूबकर व उमर फारूक (रजि.) असे हे तीन चंद्र आहेत.

हजरत आएशा (रजि.) आता विधवा झाल्या होत्या. अशा अवस्थेत त्यानी चाळीस वर्षाचा जीवन प्रवास पार केला. जिवंत असेपर्यंत त्या कबरीच्या जवळच होत्या. प्रेषितांच्या कबरीजवळच झोपत होत्या. एके दिवशी त्या प्रेषिताना स्वप्नात पाहिल्या व तेथे झोपायचे सोडून दिल्या. तेरा वर्षांपर्यंत ती विना परदा तेथे जात येत होत्या. हजरत उमर फारूक

(रजि.) याना तेथे दफन करण्यात आल्यापासून बिगर परद्यात त्या गेल्या नाहीत. तेथे आपले पती व वडील होते. तेव्हा त्या जात येत होत्या. हजरत उमर (रजि.) यांना दफन केल्यानंतर मात्र त्या परद्यात जात येत होत्या. प्रेषितांच्या पत्नीना दुसरे लग्न करण्यास अल्लाहने मनाई केलेली होती. प्रेषितांच्या निधनानंतर अरबस्तानातील एक श्रीमंत माणूस हजरत आएशा (रजि.) यांच्याशी विवाह करण्याची इच्छा प्रकट केल्या. ही बाब इस्लाम व पैगंबराच्या दृष्टिने विरोधात होती. अल्लाह तआला म्हणतात की, पैगंबर इतर माणसापेक्षा अल्लाहच्या जवळ आहेत. तुम्हाला ही परवानगी नाही पैगंबराना त्रास होऊ नये. पैगंबराच्या पत्नीशी विवाह करू नका, असे अल्लाहने सांगितले आहे.

मुख्य गोष्ट ही आहे की प्रेषित पत्नी प्रेषित्वाची शान आहे. त्याचे कार्य निश्चित केले आहे. इस्लामच्या अनुयायींच्या त्या माता आहेत. त्यांच्या जीवनाचा प्रत्येक क्षण हा इस्लामच्या शिकवणीसाठी निश्चित केलेला आहे. त्यांचे कार्य अल्लाहने निश्चित केले आहे. त्या जिवंत असेपर्यंत हेच कार्य करणार आहेत.

पैगंबरांच्या पत्नीनो! कुणी वाईट वागाल तर तुम्हाला दुप्पट शिक्षा (अजाब) करेन. परमेश्वरासाठी ही खूप सोपी गोष्ट आहे. तुमच्यातून अल्लाह व रसूल (स्व.) यांचे आज्ञापालन कराल तर तुम्हाला दुप्पट पुण्य मिळेल. यांच्यासाठी मी कयामतमध्ये चांगला व पाक सलोखा करेन. हे पैगंबरांच्या पत्नीनो! तुम्ही इतर स्त्रियाप्रमाणे मामूली नाही. तुमचा दर्जा वेगळा आहे. तुम्ही आज्ञाधारक बना. चांगली वागणूक ठेवा. हे विसरू नका. कमकुवत मन असेल तर धीर धरा. चांगल्या गोष्टी कथन करा. आपल्या घरात इज्जतीने रहा. शृंगार करून, नटून थटून घराबाहेर पडू नका. नमाज पठण करा. अल्लाह व रसूल यांचा आदेश पाळा. अल्लाहची हीच मर्जी आहे. हे पैगंबरांच्या वंशातील लोकानो या नबूवतद्वारे या मनातील घाण दूर करा. तुम्हाला बिलकूल साफ व पवित्र करू दे. तुमच्या घरातील हिकमत व अल्लाहच्या गोष्टी इतराना सांगा. या सर्व गोष्टीना आठवणीत ठेवा. बेशक अल्लाह पवित्र व जाणणारा आहे. (सूर-ए-

एहजाब-४) हजरत आएशा (रजि.) याचे जीवन या पवित्र आयतीच्या आधीन आहे.

सामाजिक परिस्थिती

आता हजरत आएशा (रजि.) यांचे वडील हजरत अबूबकर सिद्धिक (रजि) हे खिलाफतीच्या पदावर होते. हुजूर (स्व.) यांचे सर्व विधी पूर्ण झाल्यानंतर सर्व प्रेषित पत्नीनी एकत्र येऊन विचार विनिमय करून हजरत उस्मान (रजि.) याना दूत म्हणून हजरत अबूबकर (रजि.) यांच्याकडे वारसा हक्काची मागणी करण्यासाठी पाठविले. हजरत आएशा (रजि.) यानी प्रेषितानी सांगितलेल्या गोष्टीची आठवण करून दिली. प्रेषित म्हणाले होते की 'माझ्यानंतर माझा कोणीही वारस राहणार नाही. माझी सारी इस्टेट गरिबाना दान करून टाका.' हे ऐकून सर्वजण शांत बसले. खरी बाब अशी आहे की दोनही जगातला हा शहेनशहा आपल्या जीवनात आपल्याजवळ काय काय ठेवलेले होते? जे काही आपल्या मृत्युनंतर दानात द्यायचे होते. सही बुखारीत अशी नोंद आहे की प्रेषितानी आपल्या मृत्युनंतर दिरहम दिनार, जनावरे, सेविका व गुलाम काहीही ठेवले नाही. आपला खर्च भागविण्यासाठी काही खजुराच्या बागा त्यांच्या ताब्यात होत्या. आपल्या जीवनातील खर्च भागविण्याकरीता या बागेतील उत्पन्न घेत होते. आपल्या इतर पत्नीना वार्षिक खर्चासाठी याच बागेतून आलेले पैसे देत होते. हजरत अबूबकर याने आपल्या जीवनात हीच पद्धत कायम ठेवली. अशीच पद्धत खिलापतीच्या काळात कायम होती. हजरत आएशा (रजि.) यांचा प्रामाणिकपणा त्यांचा गौरव वाढविणारा आहे. ज्या दिवशी त्या विधवा झाल्या त्या दिवशी त्यांच्या घरात एक वेगळी रोशनी पसरलेली होती. याचा प्रत्यय सर्वांना आला.

वडिलांचे दु:ख

हजरत अबूबकर (रजि.) खिलाफत पदावर फक्त दोन वर्षेच होते.

सन १३ हिजरीत हजरत अबूबकर (रजि.) यांचे निधन झाले. शेवटच्या क्षणी अबूबकर यांची कन्या आएशा हजर होती. ह. अबूबकर (रजि.) यानी आपली काही संपत्ती आपल्या मुलीला दिले. हजरत अबूबकर (रजि.) यानी हजरत आएशा (रजि.) याना विचारले की प्रेषितांचे निधन झाल्यानंतर त्यांच्या कफनात किती कपडे होते. तीन कपडे होते असे उत्तर दिले. पुन्हा विचारले की तो दिवस कोणता होता. तो दिवस सोमवार होता. पुन्हा विचारले की आज कोणता दिवस आहे. सांगितले की आज सोमवार आहे. हजरत अबूबकर (रजि.) म्हणाले की आज रात्री मी जाणार आहे. मग त्यानी आपल्या चादरीकडे पाहिले. या चादरीवर जाफरानचे डाग होते. याच चादरीला स्वच्छ धुवून याच्यावर अजून दोन कपडे घालून मला कफन द्या. असेही सांगितले की हे कपडे जुने आहेत. मुडद्यापेक्षा जिवंत लोकाना नवीन कपडयाची गरज आहे. यानंतर मंगळवार रात्री त्यांचे निधन झाले. हजरत आएशा (रजि.) यांच्याच हुजऱ्यात प्रेषितांच्या कबरीशेजारी प्रेषितांच्या कबरीच्या थोडेसे पाठीमागे त्याना दफन करण्यात आले. आता हा दुसरा चंद्र तेथे विश्रांती घेत होता. हजरत आएशा (रजि.) याना आपल्या वडिलांचे निधन झालेले सहन झाले नाही. त्या अतिशय दु:खी झाल्या. दोन वर्षातच त्याना या कमी वयातच या दु:खद घटनेला सामोरे जावे लागले. प्रेषितांच्या निधनाच्या दु:खातून सावरलेही नव्हते तर लगेच दोन वर्षानी वडिलांचा मृत्यू त्याना हादरा देऊन गेला.

***

५ । उम्मूल मोमीनीन हजरत आएशा (रजि.)

रंग व रूप

हजरत आएशा (रजि.) यांचा रंग लालसर व पांढरा होता. अतिशय सुंदर होत्या. कपड्याचा एकच जोडा त्यानी ठेवला होता. त्यालाच धुवून धुवून वापरीत होत्या. एक कुर्ता होता. त्याची किमत पाच दिरहम होती. त्या काळात तो अतिशय महागडा होता. लोक लग्नात व इत्यादी कार्यक्रमासाठी मागून घेऊन जात होते. कधी कधी जाफरानचा रंग देऊन कपडे नेसत होत्या. कधी कधी त्या दागिने नेसत होत्या. गळ्यात यमन येथे बनविलेला. पांढऱ्या काळ्या रंगाचा चांदीच्या शिक्क्यांचा हार होता. बोटात सोन्याच्या अंगठ्या होत्या.

स्वभाव व वागणूक

हजरत आएशा (रजि.) यांचे जीवन लहानपणापासून आपल्या तरुण वयापर्यंतचे सारे जीवन प्रेषितांच्या सान्निध्यात गेले. जगात बुलंद स्वभाव व वागणूक घेऊन आल्या होत्या. त्यांच्या आत्म्याला अल्लाहने बुलंद उंचीवर पोहचविले. हजरत आएशा (रजि.) यांचा गुणगौरव

करण्यासाठी शब्द अपुरे पडतात, त्यांच्या वागणुकीचा दर्जा बुलंद होता. त्या संयमी, शांत, प्रार्थनेत मग्न व करूणाशील मनाच्या होत्या. आपले घरेलू जीवन त्यांनी अनेक उपवास व चिंतनतेत घालविले. जिभेवर एकही अपशब्द आलेला नाही. ही त्यांची खुबी होती. संयमाने सारे सहन केले. चमक धमकणारे कपडे, किमती दागिने, भव्य इमारत, किमती वस्तू व स्वादिष्ट भोजन त्याना कधी मिळालेले नाही. लढाई जिंकल्यानंतर ज्वालामुखी आल्याप्रमाणे संपत्ती येत होती व दुसरीकडे ती जात होती. कधीही त्यानी त्या संपत्तीला स्पर्श केला नाही. कोणतीही वस्तू त्यानी घेतली नाही. कधीही पोटभरून जेवले नाही. कारण मी जर पोटभरून जेवले असते तर मला रडू आले नसते. त्यांच्या एका विद्यार्थिनीने विचारले की असे का? हजरत आएशा (रजि.) फर्मावितात की हुजूर अकरम (स्व.) कधीही दोन वेळा जेवण पोट भरून केले नाही. अल्लाहची शपथ ते कधीही दिवसातून दोन वेळा पोट भरून भाकरी आणि मटण जेवले नाहीत.

हजरत आएशा (रजि.) यांना मूलबाळ नव्हते. इतर मुसलमानांच्या मुलावर तिची माया होती. खास करून अनाथ मुलाना त्या जीवापाड जपत होत्या.

मदत

अल्लाहने हजरत आएशा (रजि.) याना नबीच्या दरबारची मलेका बनविली. याची जाणीव त्यांच्या मनात होती. स्त्रिया काही अडचणी घेऊन आल्या की लगेचच प्रेषितासमोर मांडत होत्या. अशा स्त्रियांची सेवा करीत होत्या

पतीचा आदर

प्रेषितांचा आदर, आज्ञाधारकता, प्रत्येक गोष्टीचा स्वीकार व त्यांच्या आनंदासाठी रात्रंदिवस प्रयत्न करीत होत्या. प्रेषितांच्या चेहऱ्यावर थोडीशीही नाराजी वा चेहरा हिरमुसलेला असला की त्या बेचैन होत होत्या. प्रेषितांच्या

नातेवाईकांची कोणत्याही गोष्टीला नकार देत नव्हत्या.

वाणीवर नियंत्रण

कधीही त्यानी वाईटपणा घेतलेला नाही. हजरत आएशा (रजि.) यांच्याविषयी अनेक हजारो रिवायती आहेत. मात्र त्यांचा अनादर करणारी एक पण रिवायत नाही. सवतीशी कधीही तक्रार केलेली नाही. कमी-जास्त झाले की लगेचच ते मिटवून घेत होते. आपल्या सवतीच्या वैशिष्ट्यांना ते आनंदाने वर्णन करीत होत्या. त्यांचा चांगुलपणा आवर्जुन सांगत होत्या.

एकेदिवशी एका माणसाविषयी चर्चा चालू होती. लोकांनी सांगितले की ज्याची चर्चा करीत आहात, तो तर आता मेलेला आहे. हे ऐकून लगेचच त्याला ईश्वराने माफी करावी अशी प्रार्थना करण्यात आली. अगोदर तुम्ही त्याला चांगला आहे असे म्हणत नव्हता. आता तो मेल्यानंतर त्यांच्याविषयी प्रार्थना करता? असे लोकांनी विचारले. हजरत आएशा (रजि.) सांगतात की प्रेषितानी असे सांगितले आहे की, प्रेतांच्या भलाईसाठी चर्चा करा, अन्य काहीही बोलू नका.

उपकार

आपल्यावर जर कोणी काही उपकार केले तर आपणही परतफेड करायला पाहिजे. एका युद्धात इराकच्या मालातून एक मोत्याची डबी सापडली. हजरत उमर (रजि.) यानी तमाम मुसलमानांच्या परवानगीने हजरत आएशा (रजि.) याना भेट म्हणून पाठविली. डबी पाहून त्या म्हणाल्या की हे परमेश्वरा आता या उमरच्या उपकारातून मुक्ती मिळण्यासाठी मला जिवंत ठेवू नको. अशी आएशा (रजि.) यांची भावना होती. हजरत अब्दुला बिन आमीर हे अरबस्तानातील अत्यंत श्रीमंत गृहस्थ होते. त्यानी काही कपडे व रुपये भेट म्हणून पाठविले. आम्ही कोणाची कोणतीही वस्तू स्वीकारत नाही असे म्हणून परत पाठविण्याचा विचार मनात आला. लगेचच प्रेषितांची वाणी ध्यानात आल्यानंतर ते कपडे व रुपये परत पाठविले नाहीत.

स्व-स्तुतीपासून बचाव

आपली स्तुती स्वत:च कधी करून घेत नव्हत्या. प्रेषित अतिशय आजारी असताना त्याना भेटण्याची हजरत इब्ने अब्बास (रजि.) यानी इच्छा प्रकट केली. हजरत आएशा (रजि.) यानी ओळखले की ते आले की माझी स्तुती करतील. यासाठी त्याना उशिरा परवानगी दिली. हजरत इब्ने अब्बास (रजि.) यानी स्तुती सुरू केली. त्या तात्काळ म्हणाल्या, माझा जन्म मुळी झाला नसता तर! हजरत आएशा (रजि.) न्यायप्रिय होत्या. एकदा त्यांच्याकडे एक माणूस आला. त्याच्या देशाची चौकशी केली. युद्धात तुमच्या देशाच्या बादशहाची वागणूक कशी आहे. कोणाचा उंट मेला तर तो बादशहा दुसरा उंट देतो. सेवक नसेल तर सेवक देतात. खर्चाची गरज पडली तर ते खर्च देतात. त्यानी भाऊ मोहम्मद बिन अबूबकर यांच्याशी वाईट वागले हे तुम्हाला सांगण्यासाठी मला कोणी मनाई करू शकत नाही. प्रेषितानी माझ्या याच घरात दुवा केली की अल्लाह! जो माझ्या अनुयायांवर सक्ती करेल त्यांच्यावर तू सक्ती कर. जो माझ्या अनुयायांवर नरमी व प्रेमाने वागेल, त्याच्यावर तू नरमी व प्रेमाची बरसात कर.

मनस्वीपणा

हजरत आएशा (रजि.) यांच्या स्वभावात मनस्वीपणा होता. हजरत आएशा (रजि.) व हजरत अस्मा (रजि.) या दोघी बहिणी अतिशय प्रेमळ व दयाळू होत्या. हजरत अब्दुलाबिन जुबेर (रजि.) म्हणतात की या दोन्ही बहिणी अतिशय श्रद्धाळू मायाळू व दयाळू आहेत. अशा बहिणी वा अशा स्त्रिया मी कोठेही पाहिलेल्या नाहीत. हजरत आएशा (रजि.) थोडे थोडे पैसे जमा करीत होत्या. ते जमा केलेले पैसे गोर गरिबाना वाटत होत्या. हजरत अस्मा (रजि.) आपल्याकडे आलेल्या वस्तू ते पटकन गरिबाना दान करीत असत. सतत इकडून तिकडून कर्ज घेत होती. लोक तिला कर्ज हवे आहे का? असे विचारत असत. ज्याला पैशांची गरज आहे त्याला अल्लाह मदत पाठवितो. मी त्या मदतीचा शोध घेत असते. घेतलेले कर्ज फेडण्याची नियत असावी. अशी त्यांची विचारसरणी होती.

एकदा एक गरीब स्त्री आली. त्या बाईच्या ओटीत दोन मुले होती. योगायोगाने घरात काहीच नव्हते. फक्त एकच खारीक होते. या खारकेचे दोन तुकडे करून या दोन्ही मुलाना दिले. असा स्वभाव हजरत अस्मा (रजि.) यांचा होता. जे असेल ते दान करून टाकत असत.

हजरत अरवाह (रजि.) म्हणतात की, एकदा हजरत आएशा (रजि.) यानी सत्तर हजार रुपये अल्लाहच्या मार्गात खर्च केले आहेत. अमीर माआविया (रजि.) यानी एक लाख दिरहम सायंकाळ होईपर्यंत गरिबाना वाटण्यासाठी दिले. त्यादिवशी रोजा होता. रात्र झाली. मुलीने म्हंटले की रोजा सोडण्यासाठी काहीतरी आणण्यासाठी काही पैसे ठेवायचे होते. म्हणाले की, आठवणीत आणायचे काम तुझे होते. रोजा इफ्तारसाठी देखील एक दिरहम ठेवले नाही. हजरत जुबेर (रजि.) यानी दोन मोठ्या पिशव्या पाठविल्या. या पिशव्यात एक लाखाची रक्कम होती. ही एक रक्कम त्यानी एका ताटात ठेवली व त्याला वाटायला सुरवात केली. रात्र झाली. रात्री थोडेसे मटण आणायला सांगितले. मात्र या रक्कमेतून मटण आणू नको असे सांगितले. एकदा अशीही घटना घडली की हजरत आएशा (रजि.) रोजा होत्या. घरात फक्त एका भाकरीशिवाय काहीच नव्हते. एक भिकारी घरासमोर आवाज देऊ लागला. ती एक भाकरी त्या भिकारीला देण्यासाठी सांगितले. घरात काम करणाऱ्या मुलीने सांगितले की आता रात्री इफ्तारनंतर जेवायला काहीही नाही. रात्र झाली. कोणीतरी मटणाचे कालवण व भाकऱ्या पाठवून दिले. हजरत आएशा (रजि.) त्या मुलीला म्हणाल्या की अल्लाहने त्या भाकरीपेक्षा चांगला पदार्थ खाण्यासाठी पाठविलेला आहे.''

हजरत अब्दुला बिन जुबेर (रजि.) हे आएशा (रजि.) यांचे भाचे होते. अतिशय लाडके होते. ते नेहमी सेवा करीत होते. हजरत आएशा (रजि.) याचा दानशूर स्वभाव पाहून ते घाबरले. एकेदिवशी आता आपण त्याना दान करू नका. असे सांगितले पाहिजे' असे वाक्य मुखातून बाहेर पडले. मावशीला म्हणजेच हजरत आएशा (रजि.) याना राग आला. त्यानी निश्चय केला की आता अब्दुला बरोबर बोलायचे नाही. कितीतरी

दिवस हजरत जुबेर (रजि.) याना या रागाचे शिकार व्हावे लागले. शेवटी एकेदिवशी हजरत आएशा (रजि.) याने त्याना माफ केले.

भक्ती

हजरत आएशा (रजि.) सतत नमाज पठण करीत असत. सकाळची नमाज पठण करीत होत्या. अगर माझा बाप कबरीतून येऊन जर म्हणाला की तू नमाज पठण करू नको तरी मी ऐकणार नाही. प्रेषिताबरोबर रात्री उठून तहज्जूदची नमाज पठण करीत होत्या. चुकून जाग आली नाही तरी सकाळची नमाज पठण करण्याअगोदर तहज्जूद पठण करून मग फजरची नमाज पठण करीत असत. एकदा त्यांचे भाचे कासम आले. त्याना विचारले की ही कसली नमाज आहे? मी रात्री नमाज पठण केले नाही. आता सकाळी त्या नमाजला मी सोडू शकत नाही. रमजानच्या महिन्यात खास करून तरावीहची नमाज अदा करीत होत्या. त्यांच्या घरी 'जकवान' नावाचा गुलाम होता. तो ईमाम होता. तो कुरआन पठण करीत असे. हजरत आएशा (रजि.) कुरआन ऐकत होत्या व त्याचे अनुकरण करीत होत्या.

नेमाने त्या हजयात्रा करीत होत्या. एखादे वर्ष असे जात होते की त्या हजयात्रा केल्या नाहीत. हजरत उमर (रजि.) आपल्या शेवटच्या कार्यकिर्दीत हजरत उस्मान (रजि.) व हजरत अ. रहेमान बिन औफ (रजि.) याना आपल्या माताबरोबर हज यात्रेला रवाना केले. हजच्या दरम्यान मुक्काम करण्यासाठी मुक्कामाचे ठिकाण निश्चित केले होते. पहिल्यांदा प्रेषितांच्या तबीयतीचा विचार करून अरफातच्या मैदानातील शेवटच्या टोकाला नमरा येथे उतरत होते. येथे जर लोकांची गर्दी झाली की मग आपला तंबू अराक येथे उभा करीत होते. कधी डोंगराच्या कुशीत थांबत होते. जोपर्यंत तेथे मुक्काम असायचा तोपर्यंत स्वत: व आपल्या साथीदारासमवेत 'तकबीर' पठण करीत होते. जेव्हा येथून निघत तेव्हा 'तकबीर' पठण करणे बंद करीत होते. मोहरमचा चंद्र पाहून उमराची निय्यत करीत होत्या. अरफाच्या दिवशी रोजा करीत. रात्रीच्या वेळी

लोक रवाना होताना त्या रोजा सोडत होत्या.

एकदा फक्त एका किरकोळ गोष्टीसाठी प्रायश्चित म्हणून प्रेषितानी चाळीस गुलाम आजाद केले. प्रेषितानी मुक्त केलेल्या गुलामांची संख्या सदुसष्ट (६७) होती. मदिना येथे 'बरिरा' नावाची मुलगी होती. त्या मुलीच्या मालकाने एवढी रक्कम भरल्यास मी तुला गुलामगिरीतून मुक्त करतो! ही रक्कम गोळा करण्यासाठी या मुलीने वर्गणी (चंदा) मागितली. ही बाब हजरत आएशा (रजि.) याना समजली. लगेचच त्या मालकाची सारी रक्कम भरून हजरत आएशा (रजि.) याने तात्काळ त्या मुलीला गुलामगिरीतून मुक्त केले.

आपल्या परिस्थितीनुसार इतराना मदत

आपल्याकडे कोणीही मदतीसाठी आला तर त्याला मदत करा. हेच त्याच्या आजाराचे औषध आहे. आपल्या परिस्थितीनुसार गोरगरिबाना आपण मदत करायला हवी. समजा आपल्याजवळ एखादा श्रीमंत माणूस असेल तर त्या व्यक्तीशी प्रेमाने वागा. त्याची कदर करा. हजरत आएशा (रजि.) या बाबीवर कटाक्षाने यावर लक्ष ठेवीत होत्या. एकदा एक मामूली माणूस आला. त्याला भाकरी दिली व तो निघाला. यानंतर अजून एक माणूस आला. त्याला बसवून जेवण घातले. व त्याला परत पाठवले. लोकांनी विचारले की एकाला भाकरी दिली व एकाला बसवून जेवू घातले. असा भेद का केला. प्रेषितांचा आदेश आहे की माणसाच्या कुवतीनुसार त्याच्याशी वागायला पाहिजे.

एकदा यात्रेच्या वेळी काही स्त्रिया हजरत आएशा (रजि.) याना म्हणाल्या की, चला आपण हज्जे अस्वदला बोसा घेऊ. हजरत आएशा (रजि.) म्हणतात की तुम्ही जा. मी पुरुषांच्या गर्दीत येऊ शकत नाही. तवाफ करताना हजरत आएशा (रजि.) काबाजवळ फक्त स्त्रियांना परवानगी देत असत. पुरुषाना परवानगी देत नव्हते. तवाफ करताना चेहऱ्यावर पडदा राहत असे. इसहाक तबआ हे दोन्ही डोळ्याने आंधळे होते. ते खिदमत (सेवा) करण्यासाठी सामील झाले. हजरत आएशा (रजि.)

यांच्याशी बोलताना परदा केला. माझे तर दोनही डोळे आंधळे आहेत. मी तर तुम्हाला पाहू शकत नाही. हजरत आएशा (रजि.) म्हणतात की, तुम्ही मला पाहू शकत नाही हे खरे आहे. मात्र, मी तुम्हाला पाहू शकते. हजरत आएशा (रजि.) अतिशय पवित्र होत्या. हजरत उमर (रजि.) याना आपल्या हुजऱ्यात दफन केल्यानंतर कधीपण बेपर्दा त्या आपल्या हुजऱ्यात कधीच गेल्या नाहीत. याच हुजऱ्यात प्रेषित व अबूबकर सिद्धीक (रजि.) यानाही दफन केले होते. या अगोदर ती बेपर्दा जात येत होत्या. जेव्हा हजरत उमर (रजि.) याना दफन करण्यात आले. त्यानंतर त्यानी बेपर्दा जाणे–येणे बंद केले.

प्रेषिताना रूअिआ ए सादिका याने हजरत आएशा (रजि.) याना हरम नबवीत आल्याची खुषखबरी दिली. हजरत आएशा (रजि.) यांच्या बिछान्यावर 'वही' अवतरली. अल्लाहची 'वही' अन्य कोणत्याही प्रेषित पत्नींच्या घरात अवतरलेली नाही. जिब्राईलने त्यांच्या घरातील आस्तान्यावर आपली सलामती पाठवली. दोन वेळा हजरत आएशा (रजि.) आपल्या डोळयानी जिब्राईल अमीन याना पाहिले.

हजरत आएशा (रजि.) म्हणतात की, मी गर्व करीत नाही. मी असे अभिमानाने म्हणते की अल्लाहने मला या जगात नऊ गोष्टीने गौरविले आहे. देवदूताने प्रेषितासमोर चेहरा दाखविला. मी सात वर्षाची होते तर प्रेषिताने माझ्याशी विवाह केला. मी नऊ वर्षाची असताना प्रेषितांच्या घरी आले. मीच फक्त कुमारी होते. प्रेषित जेव्हा माझ्या बिछान्यावर येत होते. तेव्हा 'वही' अवतरत होती. माझ्या शिवाय कोणत्याच प्रेषित पत्नींच्या बिछान्यावर वही अवतरली नाही. मी स्वत: जिब्राईल अमीन याना पाहिले. प्रेषितानी माझ्याच ओटीत शेवटचा श्वास घेतला.

माझ्याशिवाय या गोष्टी कोणालाही मिळालेल्या नाहीत.

कृपा व चमत्कार

हजरत आएशा (रजि.) यांचे स्थान सहाबी, इतर सामान्य स्त्रिया, काही बुजुर्ग व्यक्ती यांच्यापेक्षाही उंच होते. हजरत आएशा (रजि.) याना

काही विचारले तर त्या प्रश्नांचे उत्तर ते देत होते. आम्हाला कोणताही बाका प्रसंग आला तर आम्ही सहाबा हजरत आएशा (रजि.) याना विचारल्यानंतर तो सुटत होता. अशी नोंद हजरत अबुहुरैरा याने केलेली आहे.

ज्ञान

हजरत आएशा (रजि.) ह्या ज्ञानी होत्या. स्त्री-पुरुषात त्यांची ख्याती होती. त्यांचे स्थान बुलंद आहे. हजरत उमर फारूक (रजि.) हजरत अली मुर्तुजा, अब्दुल्ला बिन मसऊद व अब्दुल्ला बिन अब्बास (रजि.) या महनीय व्यक्ती बरोबर हजरत आएशा (रजि.) यांचे नाव आदराने घेतले जाते.

कुरआन पाक

सर्वांना माहित आहे की अल्लाहचा पवित्र संदेश अवतरण्यासाठी तेवीस वर्षाचा काळ लागला. हजरत आएशा (रजि.) कुरआन अवतरण्याच्या चौदाव्या वर्षी प्रेषितांच्या घरी आल्या. या वेळी त्यांचे वय नऊ वर्षे होते. प्रेषिताबरोबर फक्त दहा वर्षे राहण्याची संधी मिळाली. कुरआन अवतरण्याचा काळ हा अर्ध्यापेक्षा जास्त आहे. हजरत आएशा (रजि.) यांचा बालपणातील काळ देखील वाया गेलेला नाही. प्रेषित मुहम्मद पैगंबर दररोज हजरत अबूबकर सिद्दिक (रजि.) यांच्या घरी जात असत. हजरत अबूबकर (रजि.) यानी आपल्या घरात मस्जीद बनविली होती. या मस्जिदीतून लोकाना इस्लामचा संदेश देत होते. याचा हजरत आएशा (रजि.) याना खूप मोठा फायदा झाला.

हुजूर (स्व.) यांचे निधन झाल्यानंतर पण कुरआन ग्रंथाच्या स्वरूपात नव्हते. हजरत अबूबकर यांनी आपल्या काळात कागदावर लिपीबद्ध केले. याच काळात अनेक सहाबानी कुरआनला रोज पठण करून कुरआनचे पाठांतर केले होते.

अबू युनूस हजरत आएशा (रजि.) यांचे गुलाम होते.ते लिखाण

करीत होते. त्यांचे अक्षर चांगले होते. हजरत आएशा (रजि.) यानी त्यांच्या हस्ते कुरआन लिहून घेतले होते. इराकमधून एक व्यक्ती हजरत आएशा (रजि.) याना भेटण्यासाठी आले होते. त्यानी आएशा याना कुरआन दाखविण्यासाठी सांगितले. त्यानी कारण विचारले. ते साहेब म्हणाले की, आमच्याकडे कुरआन व्यवस्थित पद्धतशीरपणे पठण करतात. मला असे वाटते की आपल्या कुरआनसारखे मी देखील तसेच करून घ्यावे. प्रेषिताने फर्माविले की कुरआनमधील सूरते मागेपुढे झालेली असतील तर चालतील. नंतर मात्र आपल्याकडील कुरआनप्रमाणे सुरवातीची आयत वाचून लिहिण्यास सांगितले.

हजरत आएशा (रजि.) यांचा असा स्वभाव होता की त्याना काही समजले नाही की मग ते प्रेषिताना विचारीत होत्या. अल्लाहकडून आदेश होता की जर समजले नाही की मग त्याचा अर्थ विचारून घ्या. आपल्या घरात अल्लाहची आयते आणि हितकारक गोष्टी वाचा व त्याला पाठ करा. याचाही अमल करणे पुण्य आहे. प्रेषित तहज्जूदच्या नमाजमध्ये मोठी मोठी आयते पठण करीत असत. अल्लाहच्या आठवणीत गर्क होत असत.

हजरत आएशा (रजि.) नमाज पठण करताना प्रेषितांच्या पाठीमागे असायच्या. अल्लाहची 'वही' फक्त हजरत आएशा (रजि.) यांच्या घरातील अंथरूणावरच अवतरलेली आहे. कुरआन अवतरीत होताना हजरत आएशा (रजि.) याना पहिल्यांदा आवाज येत होता. त्या म्हणतात की सूर ए बकरा व सूर ए निस्सा याचे अवतरण होत असताना मी प्रेषिताजवळच होते. यामुळेच हजरत आएशा (रजि.) याना कुरआनचे पठण व पद्धत पूर्णपणे पाठांतरीत झाले होते. कोणत्याही प्रश्नाचे उत्तर त्यानी कुरआन पाकमध्ये शोधलेले आहे. आपले सारे जीवन त्यानी कुरआनच्या हवाल्याने जगले आहे. काही साहबा त्याना भेटण्यासाठी आले. आम्हाला प्रेषितांच्या काही गोष्टी सांगा असे सहाबा म्हणाले. हजरत आएशा (रजि.) म्हणाल्या की, तुम्ही कुरआन पठण करीत नाही का? प्रेषिताचे जीवन म्हणजे कुरआन आहे. त्याचे जीवन कुरआनच्या

नीती नियमानेच आहे. कुरआनपाकचा आदेश पाळा असे सांगितले. रात्रीच्या समयी प्रेषित काय पठण करतात? हजरत आएशा (रजि.) म्हणतात की सूर ए मुज्जमीलचे पठण केले नाही का? अशा प्रकारे हजरत आएशा (रजि.) यानी आपल्या जीवनातील प्रत्येक प्रश्नाना शोधण्यासाठी कुरआनचा आधार घेतलेला आहे.

***

पान क्र.	शब्दांचे अर्थ
१) रजी	– ज्यांच्यावर अल्लाह खुश आहे ती व्यक्ती.
१) उम्मुल	– माता
१) मोमीनीन	– मुसलमान
४) मौलाना	– इस्लामी पंडित
७) सल्ल.	– त्यांच्यावर शांतीचा वर्षाव होवो.
८) खुतबा	– प्रवचन
८) दिरहम	– नाणे
८) महेर	– वराकडून वधूला दिली जाणारी रक्कम
११) हिजरत	– स्थानांतर
१३) असहाब	– वस्तू
१६) तहज्जूद, वितर	– रात्रीची नमाज
२१) साहबी	– सहकारी
५४) सहाबिया	– स्त्री सहकारी

६ । हजरत आएशा (रजि.) यांचे स्त्रियावर उपकार

हजरत आएशा (रजि.) यानी आदम व हव्वाच्या वंशजावर म्हणजेच हव्वाच्या मुलीवर अत्यंत उपकार केलेले आहेत. सर्वात मोठा उपकार हे आहे. परद्यात राहून मुस्लीम स्त्रिया सामाजिक, धार्मिक, राजकीय कार्यात अग्रेसरपणे काम करू शकतात. हे जगाला दाखवून दिलेले आहे. इस्लाममध्ये स्त्रियाना इज्जत व स्त्रियांचा आदर केलेला आहे. स्त्रियांचे जीवन समृद्ध व सुखी करण्यासाठी इस्लामने प्रयत्न केलेला आहे. उम्मूल मोमीनीन हजर आएशा (रजि.) यांचे जीवन म्हणजेच एक बहुमोल उदाहरण आहे.

सहाबा आपले म्हणणे हजरत आएशा (रजि.) यांच्या मार्फत प्रेषितापर्यंत पोहोचवीत होते. सहाबांची व्यवस्था व काळजी करीत होत्या. हजरत उस्मान बीन मजऊन (रजि.) हे खूप सज्जन व भक्तीवान सहाबी होते. ते खूप नीतीनियमाने आपले जीवन जगत होते. एकेदिवशी त्यांची पत्नी हजरत आएशा (रजि.) यांच्याकडे आली. ती अतिशय साध्या कपड्यात होती. येण्याचे कारण विचारले असता ती मोठ्या अदबीने

म्हणाली की, माझे पती रात्रभर नमाज पठण करतात. दिवसभर रोजा ठेवतात. इतक्यात प्रेषित आले. त्यांच्यासमोर हजरत आएशा (रजि.) यानी ही गोष्ट सांगितली. प्रेषित हजरत उस्मान (रजि.) यांच्याकडे गेले होते. प्रेषित त्याना म्हणाले की, उस्मान मला संन्यासी जीवन जगण्याचा आदेश अल्लाहकडून आलेला नाही. माझे जीवन तुमच्यासमोर नाही का? मला अल्लाहची भीती आहे. मी अल्लाहला घाबरतो. अल्लाहच्या नियमांची मी अमलबजावणी करतो. सर्व पत्नींची जबाबदारी पार पाडतो.

एक सहाबिया होती. ती रात्रभर झोपत नव्हती. रात्रभर नमाज पठण करीत होती. एकदा ती योगायोगाने समोरून गेली. हजरत आएशा (रजि.) म्हणाल्या की मुहम्मद पैगंबर (सल्ल.) ही रात्रभर झोपत नाही. प्रेषिताना आश्चर्य वाटले. रात्रभर झोपत नाही तर आपल्याला झेपेल एवढेच काम करायला सांगा. एका स्त्रिला चोरीच्या आरोपाखाली शिक्षा दिलेली होती. या स्त्रिला चोरीचा पश्चात्ताप झाला. ती माफी मागून नेक बनली. चोरी करणे सोडून दिले. इतर स्त्रिया चोरीचा आरोप आहे म्हणून तिला भेटत व बोलत नव्हत्या. ही स्त्री मात्र हजरत आएशा (रजि.) यांच्याकडे आली. आपल्या अंगावरील डाग दाखविली. प्रेषित घरात आल्यानंतर हा किस्सा प्रेषिताना सांगितला. त्या साहबीच्या पतीला समजले की आपली पत्नी आता नबीच्या दरबारात गेलेली आहे. तो पळत पळत तेथे आला. घाबरत घाबरत माफी मागितला. प्रेमाने राहण्याचा वादा केला.

स्त्रियाना कमकुवत समजणाऱ्याविषयी हजरत आएशा (रजि.) रागाला येत. हजरत आएशा (रजि.) यानी आपल्या जीवनात स्त्रियांच्या सवलतीसाठी वा उन्नतीसाठी प्रयत्न केले. असेच जीवन त्यानी स्वीकारले. धार्मिक बाबीतील काही महत्त्वाच्या गोष्टींचा निर्णय हजरत आएशा (रजि.) यांच्याकडेच होता. इस्लामी देशात हजरत आएशा (रजि.) यांच्या आदेशाची अमलबजावणी केली जाते.

हजरत इब्ने उमर यांचा फतवा असा होता की स्त्रियानी आपले केस सोडून अंघोळ करावी. हजरत आएशा (रजि.) हे ऐकून म्हणतात की, स्त्रियानी आपले मुंडन करावे असा फतवा का काढत नाहीत. मी तीन

वेळा डोक्यावरून पाणी घेते व केस सोडत नाही. असाही खुलासा केलेला दिसून येतो.

जर एखाद्या व्यक्तीने खून केलेला आहे. खुनाचा बदला खून हवा वा मरणाऱ्या माणसाची किमत मागत असेल तर त्याच्या तमाम वारसांची परवानगी घ्या. त्यांचे मन परिवर्तन करा. हजरत आएशा (रजि.) म्हणतात की प्रेषित फर्मावितात की त्यांच्या वारसात स्त्रिया असतील तर त्याना पण राजी करा. फक्त पुरुषांचीच परवानगी मान्य नाही. स्त्रियांचेही मत जाणून घ्या. वंशाचा हक्क फक्त पुरुषाना नाही. हा हक्क इस्लाममध्ये स्त्रियांना पण दिलेला आहे.

अरबस्तानात इस्लामच्या अगोदर स्त्रियाना वारसा हक्क नव्हता. इस्लाम दाखल झाल्यानंतर स्त्रियाना हक्क देण्यात आला. वारसा हक्काविषयी कुरआनमध्ये मार्गदर्शन केलेले आहे. हजरत आएशा (रजि.) आपल्या बहिर्णींचा हक्क मिळवून देण्याकरीता प्रत्येक वेळेस त्या पुढे राहिल्या. एखाद्याला मुलगा नाही. मुली व नातू आहेत. अशावेळी वारसाहक्क कोणाला द्यायचा. हजरत अब्दुल्ला बिन मसऊद (रजि.) म्हणतात की फक्त नातूलाच वारसा हक्क द्या, नातीला नको. हजरत आएशा (रजि.) नातीचा हक्क सांगतात. स्त्रिया प्रेषितांच्या दरबारात आपले प्रश्न मांडण्यासाठी येत असत. असे काही प्रश्न प्रेषित पत्नीना समजत नव्हते. अनेक गोष्टी अशा होत्या की शरमेने त्या इतरासमोर सांगू शकत नव्हत्या. हजरत आएशा (रजि.) यानी अशा गोष्टी प्रेषितासमोर सांगून त्या प्रश्नांचे उत्तर स्त्रियाना सांगून मार्गदर्शन करीत होत्या.

हजरत अबू सलमा (रजि.) हजरत अ. रहेमान बिन औफ (रजि.) यांचा मुलगा होता. एका जमिनीसाठी त्यांचा काही लोकांशी झगडा झाला. ही घटना हजरत आएशा (रजि.) याना समजली. हजरत आएशा(रजि.) याने तात्काळ अबू सलमा याना बोलावून घेतले. या जमिनीपासून तू बाजूला सरक. या भांडणापासून दूर हो. हुजूर (स्व.) फर्मावितात की एक इंच जमिनीसाठी जर कोणी जुलूम करीत असेल तर सात जग त्याच्या गळ्यात घातले जातील.

लोक मदिना शहरात बाळ जन्माला आले की प्रार्थनेसाठी पहिल्यांदा त्या बाळाला हजरत आएशा (रजि.) यांच्याकडे आणत असत. एकदा एका बाळाच्या डोक्याखाली लोखंडाचा वस्तरा नजरेस पडला. विचारले की हे काय आहे? लोक म्हणाले की या वस्तऱ्याने सैतान भूते खेते पळून जातात. हे ऐकून हजरत आएशा (रजि.) हा लोखंडी वस्तरा काढून फेकून दिला. प्रेषितानी अशा गोष्टीना विरोध केलेला आहे. असे करू नका असे सांगितले.

स्त्रियानी असे दागिने परिधान करायला पाहिजे की त्या दागिन्यांचा आवाज येऊ नये घंट्यांचा आवाज पण येऊ नये. एकदा एक मुलगी घुंगरू नेसून हजरत आएशा (रजि.) यांच्याकडे आली. हजरत आएशा (रजि.) यानी त्या मुलीला ताकीत दिली. यापुढे असे घुंगरू नेसून माझ्याकडे येऊ नको. त्या मुलीच्या पायातील घुंगरू कापून काढा. एका स्त्रीने याचे कारण विचारले. हजरत आएशा (रजि.) यानी सांगितले की, प्रेषिताचा पवित्र आदेश आहे की ज्या काफिल्यात घंटा वाजतो वा घुंगरांचा आवाज येतो तेथे देवदूत येत नाहीत.

हफ्सा बिन अ. रहेमान ही प्रेषितांची पुतणी होती. एकेदिवशी ती कमी लांबीचा दुपट्टा पांघरून आपल्या आत्याकडे आली होती. हा दुपट्टा पाहून प्रेषितानी फाडून टाकला. तिला नवा मोठा दुपट्टा आणून दिला. सूर ए नूर मध्ये अल्लाहने मार्गदर्शन केलेले तुला माहीत नाही का? असे विचारले एकदा हजरत आएशा (रजि.) यांचे भाऊ अ. रहेमान बिन अबूबकर आले. गडबडीत झटपट वजू करून गेले. हजरत आएशा (रजि.) यानी हे पाहिले नि म्हणाले की अ. रहेमान चांगल्या प्रकारे वजू करा. वजूमध्ये जो हिस्सा भिजणार नाही. त्या हिस्स्यावर नरकाची छाया आहे.

एकदा घरी पाहुणे आले होते. त्या घरातील दोन तरुण मुली डोक्यावर काहीही न पांघरता नमाज पठाण करीत होत्या. प्रेषितानी ताकीत दिली की डोक्यावर काहीही न घेता नमाज पठण करू नका. एक स्त्री प्रेषितांच्या दरबारात आली. माझ्या मुलीचे लग्न झालेले आहे. तिच्या डोक्यावरील केस गळालेले आहेत. मी बाजारातील नकली केस तिच्या

डोक्यावर लावू का? असा प्रश्न त्या आलेल्या बाईने प्रेषिताना विचारला. प्रेषित म्हणाले, नकली केस जोडणारे व जोडून घेणाऱ्यावर अल्लाहची कृपा होत नाही. प्रेषिताने दिलेला संदेश अनमोल आहे. उम्मूल मोमीनीन हजरत आएशा (रजि.) आपल्या जीवनाच्या शेवटच्या श्वासापर्यंत आपल्या महिलांच्या प्रत्येक मामल्यात बाजू घेतली. त्यांच्या उन्नतीसाठी प्रयत्न केले. या मानव जातीवर खूप मोठे उपकार झालेले आहेत.

***

७ । उफक (खोट्या आरोपाची घटना)

मदिन्यात आल्यानंतर मुसलमानाना अनेक संकटांचा सामना करावा लागला. मक्का येथील वातावरण बिलकूल वेगळे होते. मदिना येथे दोनही बाजूनी बोलणाऱ्या लोकांचा गट तयार झाला होता. हे लोक सतत इस्लामचा विरोध करीत होते. माणसाच्या जीवनात सर्वात मोठी गोष्ट म्हणजे त्याची आबरू आहे. माणसाच्या आबरू व इज्जतीवर कोणी हल्ला करीत असेल तर ती बाब अतिशय निंदनीय आहे. इस्लामला इनामदार, दयाळू, श्रद्धाळू साथीदार मिळालेले होते. याचप्रमाणे दुश्मनही तयार झाले होते. आपापसात लढविणे हे खूप मोठे हत्यार या लोकानी तयार केले होते. कोणाचीही इज्जत काढायची. खोटे नाटे आरोप करायचे. लोकांत गैरसमज परसविणे. अशा भानगड्या हे दुर्तोंडी लोक करीत होते.

हजरत आएशा (रजि.) यांच्यावर आरोप लावला. ती घटना अशी आहे, प्रेषित प्रवासाला जात असताना आपल्या पत्नींच्या नावाची चिठ्ठी घालत. ज्यांच्या नावाची चिठ्ठी निघेल त्याना ते प्रवासात सोबत घेऊन जात असत. एकदा प्रवासात हजरत आएशा (रजि.) याना संधी मिळाली. जाताना त्यानी आपली बहीण आस्मा (रजि.) यांचा हार मागून घेतला.

हा हार नेसून त्या प्रवासाला निघाल्या. हा हार अतिशय नाजूक होता. या वेळी हजरत आएशा (रजि.) यांचे वय चौदा वर्षे होते. त्या काळात साधा एखादा दागिना स्त्री जवळ असणे म्हणजे खूप श्रीमंती आहे, असे समजले जाई. प्रवासात हजरत आएशा (रजि.) उंटावरील मुहमिलात बसली होती. सेवक मुहमील उचलून उंटाच्या पाठीवर ठेवत होते. त्या वेळी हजरत आएशा (रजि.) सडपातळ होत्या. मुहमील उचलणाऱ्या सेवकाना काहीही जाणीव होत नव्हती. इतके हलकेसे वाटत होते. मुहम्मील म्हणजे लाकडाचा पाळणा असतो. या पाळण्यात आरामशीर दोन वा तीन माणसे बसू शकतात. हत्तीवर जशी अंबारी असते त्याप्रमाणे उंटावरच्या पाळण्याला मुहम्मील म्हणतात.

रात्रीच्या समयी एका ठिकाणावर पडाव पडला. दिवस उजाडला. काफिला रवानगीसाठी तयार झाला. हजरत आएशा (रजि.) तयार होण्यासाठी काफिल्याच्या बाजूला थोडेसे दूर गेल्या. त्या तयार होऊन आल्या. नकळतपणे त्यांचा हात गळ्याकडे केला. गळ्यातला हार नव्हता. एकतर हा मौल्यवान हार आपल्या बहिणीकडून मागून आणला होता. त्या घाबरल्या. इकडे तिकडे तो हार हुडकू लागल्या. निघण्यापूर्वी तो हार हुडकण्यासाठी ती धडपड करू लागल्या. काफिला निघाला. हार हरविल्याचे त्यानी कोणाला सांगीतले नाही. सेवक मुहम्मील उचलून उंटावर ठेवले. काफिला पुढे निघाला. हजरत आएशा (रजि.) हार हुडकण्यासाठी मागेच राहिल्या. थोडा वेळ शोधल्यानंतर हार सापडला. काफिला पुढे गेला होता. त्या काफिल्यावर आल्या. काफिल्यात सन्नाटा पसरला होता.

चादर पांघरून तेथेच बसून राहिल्या. मुहम्मीलमध्ये नसल्याचे पाहून सेवक स्वत:हून घेण्यासाठी येतील असे आएशाना वाटले. हजरत सफवान बिन मोअतल (रजि.) हे एक सहाबी होते. लष्कराच्या पाठीमागे राहत असत. शिपायांच्या हातून काही वस्तू सुटल्या तर हे सहाबी त्या वस्तू गोळा करून घेऊन येत असत. सकाळी ते सहाबी पडावावर आल्यानंतर त्याना काळी वस्तू नजरेस आली. साहबीने हजरत आएशा (रजि.) याना ओळखले. आवाज ऐकून हजरत आएशा (रजि.) झोपेतून

जागे झाल्या. सेवकाने आपला उंट बसविला. या उंटावरील मुहम्मीलमध्ये बसून काफिला जेथे विश्रांती घेत होता तेथे त्या पोहोचल्या. सेवकाच्या हातात उंटाचा लगाम होता. हजरत आएशा (रजि.) त्या उंटाच्या मुहम्मीलमध्ये होत्या. ही एक किरकोळ घटना होती. सहसा प्रवासात अशा घटना आजही घडताना दिसतात.

अब्दुल्ला बिन उबै याची जखम ताजी होती. आता त्या पाक दामन राहिलेल्या नाहीत, अशी अफवा याने पसरविली. जिकडे तिकडे ही बातमी तो पसरवू लागला. पवित्र मुसलमानानी हे ऐकून आपल्या कानावर हात ठेवले. हजरत अबू अय्युब (रजि.) हे आपल्या पत्नीला म्हणतात की जर तुला असे कोणी म्हटले तर तू ते सहन केली असतीस का? हजरत अबू अय्युब (रजि.) म्हणतात की तुझ्यापेक्षा कितीतरी पटीने हजरत आएशा (रजि.) पवित्र आहेत. त्यांच्याकडून असे काही घडेल का? अब्दुल्ला बिन उबै याला सोडून अजून तीन व्यक्ती मदिन्यात अशी अफवा पसरविण्यात अग्रेसर होते. त्यात प्रामुख्याने हस्सान बिन साबीत, दमना बिन्त हजश व मुस्तह बिन असाला अशा ह्या तीन व्यक्ती होत्या. त्या तिघापैकी दोघे या प्रवासात नव्हते. हसानला या घटनेचे दु:ख नव्हते. त्याला त्या सेवकाच्या बदनामीवर आनंद होता. बाहेरील लोक येऊन आमच्यापेक्षा जास्त प्रेषिताजवळ कसे गेले. याचे त्याला दु:ख होते.

जगात इज्जत नाजूक आहे. काचेला दगड लागला की त्याचा चुरा होतो. सज्जन माणसाला कुणी काही नावे ठेवली तर त्याला मनस्ताप होतो. इस्लाममध्येअसा प्रसंग मरियमवर गुदरला आहे. एके रात्री आईबरोबर महत्त्वाच्या गोष्टी पूर्ण करण्यासाठी जात होती. आईच्या पायाला ठेच लागली. लगेचच त्या बाईने आपल्या मुलाला काहीतरी शाप दिला. हे ऐकून हजरत आएशा (रजि.) याने त्या बाईला असे न बोलण्याची ताकीत दिल्या. आएशा (रजि.) म्हणतात की, यावेळी त्या मस्तह सहाबीच्या आईने आपल्या जीवनात घडलेली घटना कथन केली. हे सारे ऐकून पायाखालची जमीन सरकली. मी बेहोष होते. म्हणून एवढ्या मोठ्या गोष्टीची जाणीव झाली नाही. सरळ मी आई वडिलांच्या घरी आले.आईला

विचारल्यानंतर त्यानी मला दिलासा दिला. इतक्यात एक अन्सारी स्त्री आली. तिने सर्व कहाणी सांगितली. शंका घेण्यास जागा नव्हती. हे सारे ऐकताना मी बेहोष झाले. आई वडिलानी सांभाळले.येथे मला ताप आला. अशावेळी माणसाला वेगवेगळ्या गोष्टी डोक्यात येतात. लहान सहान गोष्टीवर संयम राहत नाही. प्रेषित बाहेर येऊन तबीयत विषयी चौकशी करतात व निघून जातात. हजरत आएशा (रजि.) परवानगी घेऊन माहेरी आली. माहेरी आल्यानंतर त्यांच्या डोळ्यातून अश्रूधारा वाहू लागल्या. आई वडील दिलासा देतात. जी मुलगी आपल्या नवऱ्याला प्रिय असते तिला अशा प्रसंगांना सामोरे जावे लागते.

हजरत आएशा (रजि) बेगुनाह होत्या. लोकांचे तोंड बंद करण्यासाठी पडताळणी करणे गरजेचे होते. मुहम्मद पैगंबर (स्व.) यानी हजरत अली (रजि) व हजरत उमामा (रजि.) यांच्याशी सल्लामसलत केले. हजरत उमामा (रजि.) यानी संतुष्ट केले. हजरत आएशा (रजि.) यानी समजून घेतले. हजरत अली (रजि.) यानी समजून घेतले. हजरत अली (रजि.) म्हणाले की जगात स्त्रीयांची संख्या कमी नाही. जर तुम्हाला लोकांच्या गोष्टीवर विश्वास असेल तर तुम्ही तलाक द्या व आपल्या सेविकेला विचारा की खरे काय आहे ते सांगेल. अल्लाहची शपथ ज्या प्रमाणे सोन्याचे सत्व सोनार जाणतो, त्याप्रमाणे मी त्याना ओळखते, असे ती सेविका म्हणते.

सवतीत हजरत जैनब(रजि.) हजरत आएशा (रजि.) यांच्याशी बरोबरीचा दावा करीत होत्या. जैनबची बहीण हमना या कारस्थानात सहभागी होती. प्रेषितासमोर आली. प्रेषितांनी कानावर हात ठेवले. प्रेषितानी सर्व साहबाना मस्जिदीत एकत्रित बोलाविले. त्यांच्यासमोर सर्व गोष्टीविषयी चर्चा केली. प्रेषित फर्मावितात की या शरीराला माझ्याकडून कोण शिक्षा देणार. 'अैस' या कबिल्याची श्रीमंत व्यक्ती रईस सआद बिन मआज (रजि.) हे उठून म्हणाले की आपल्या कबिल्याचा असेल तर त्याची मान छाटून टाकू. आपल्या कबिल्याचा नसेल तर तुम्ही आदेश द्या. तुमच्या आदेशाचे पालन करू. आपापसातील दुश्मनी एका खानादानातून दुसऱ्या

खानदानापर्यंत कायम राहत होती. इस्लामने याला विरोध केला. दोनही गटाना शांत करून परत पाठविले.

प्रेषित हजरत आएशा (रजि.) याच्याकडे गेले. हजरत आएशा (रजि.) अंथरूणावर निपचित पडल्या होत्या. डोळ्यातून अश्रूधारा सुरू होत्या. आई वडील दोघेही उशीला बसून समजूत काढत होते. मुहम्मद पैगंबर (स्व.) जवळ जाऊन बसले. आएशा अगर तू गुन्हेगार असेल तर, तू अल्लाहची माफी माग. अल्लाह तुला माफ करेल. आई वडिलांनी आएशाला बोलण्यासाठी सुचविले. हजरत आएशा (रजि.) म्हणतात की आता माझे डोळे सुकलेले आहेत. माझ्या डोळ्यात अश्रू नाहीत. मनाने लेखी पुरावा नसताना विश्वास ठेवला. मीच त्याच्या उत्तरात म्हणाले की मी जर नाकारले तर अल्लाह सर्व काही जाणणारा आहे. मी बेगुनाह आहे. आरोपातून मुक्त होण्यासाठी कोणाला शंका राहणार नाही. मी जर नाकारले तर लोक मानतील का? माझे हाल आता युसूफचे वडील हजरत याकूब अलेह सलाम यांच्यासारखे झाले आहेत.

आता ती वेळ आली होती. हजरत आएशा (रजि.) म्हणतात की मुहम्मद पैगंबर (स्व.) वर वहीची कैफियत जारी झाली. हसत हसत मान वर केले. कपाळावर घाम सुटला. ही आयते अवतरली. ज्या लोकानी हा आरोप लावलेला आहे हे लोक तुमच्यातलेच आहेत. तुम्ही त्याना वाईट समजू नका. कारण, यातच तुमचे हित आहे. ज्या व्यक्तींनी गुन्हा केलेला आहे, त्याला तेवढा मोठा अजाब त्याच्यावर येणार आहे. ज्या वेळी तुम्ही हे ऐकलात व चांगला इरादा का ठेवला नाही? असे तुम्ही का म्हणाला नाहीत की हा केवळ आरोप आहे. आरोप करणाऱ्यानी चार साक्षीदार का उभे केले नाहीत. साक्षीदार नसतील तर अल्लाहजवळ खोटे आहात. अल्लाहची मेहरनजर वा मेहरबानी अगर आपल्या जीवनात सामील नसती तर...! ज्या अफवा तुम्ही लोकानी उठविल्या. तुमच्यावर कोप येईल. तुम्ही तुमच्या जीभेने ही अफवा पसरवीत होता. तोंडातून काही बाही बोलत होता. असे बोलण्याचा तुम्हाला आदेश नव्हता. तुम्ही याला एक किरकोळ गोष्ट समजत होता. मात्र ईश्वराजवळ ही खूप मोठी

गोष्ट होती. तुम्ही ऐकल्यानंतर असे का म्हणाला नाहीत की अशा चुकीच्या गोष्टी आपल्या तोंडून निघू नयेत. अल्लाह पाक आहे. हा खूप मोठा आरोप आहे. अल्लाह तुम्हाला मार्गदर्शन करीत आहे. अगर तुम्ही मोमीन आहात तर असे काही बोलू नका. अल्लाह सांगत आहे. तो हिकमतवाला आहे. जो माणूस मुसलमानांचा वाईटपणा पसरवितो वा असा विचार कोणी करत असेल तर त्यांच्यासाठी हे जग वाईट आहे.

जे लोक मुसलमानांच्या भोळ्या भाबड्या स्त्रियावर आरोप करीत आहेत ते लोक या जगात व शेवटच्या समयी अतिशय दु:खी होतील. त्याना अजाब होईल. त्या दिवशी त्यांचे हात पाय व त्यांची जीभ सारे बोलू लागतील.

आईने हजरत आएशा (रजि.) याना प्रेषिताशी बोलण्यास सांगितले. हजरत आएशा (रजि.) म्हणाली की मी माझ्या अल्लाहची आभारी आहे. माझ्यावर कोणाचेही उपकार नाहीत. यानंतर हजरत आएशा (रजि.) यांच्याविषयी अफवा पसरविणाऱ्या तीन इसमाना ऐंशी ऐंशी कोडे मारण्याची शिक्षा देण्यात आली.

***

८ । तय्यमूमचा आदेश

प्रेषितासमवेत एका प्रवासात हजरत आएशा (रजि.) सोबत होत्या. प्रवासात जातुलजैश या ठिकाणी तोच हार गळ्यातून तुटून पडला. लगेच ही घटना प्रेषिताना सांगितली. सकाळची वेळ होती. प्रेषितांनी हार हुडकण्यासाठी एका माणसाला सांगितले. जेथे या काफिल्याचा मुक्काम होता तेथे पाणी कमी होते. नमाजची वेळ झाली. लोक घाबरले. हजरत अबूबकर (रजि.) यांच्याकडे गेले. हजरत आएशा (रजि.) यांच्याकडे गेले. अबूबकर आपल्या मुलीला म्हणाले की प्रत्येक वेळेस तू नवीन संकट सर्वांच्या डोक्यावर आणत असते. रागाने असे म्हणाले. प्रेषिताना त्रास होऊ नये म्हणून हजरत आएशा (रजि.) शांत राहिल्या.

प्रेषिताना जाग आली. सारी घटना समजली. इस्लाममधील सर्व परंपरांची खासियत ही आहे की योग्य घटनांच्या वेळी वही अवतरलेल्या आहेत. इस्लाममध्ये नमाजसाठी वजू आवश्यक आहे. तेथे पाणी नव्हते. वजू करण्यासाठी अडचण निर्माण झाली. त्यावेळी कुरआनपाकची आयते अवतरली. अगर तुम्ही आजारी असाल वा प्रवासात असाल तर तुम्ही आवश्यक विधी करून आल्यास वा स्त्रियाशी संभोग केलात तर तेथे

पाणी नसेल तर स्वच्छ मातीचा शोध घ्या. त्या स्वच्छ मातीने आपले हात-पाय व तोंडावर फेरा. अल्लाह माफ करणारा आहे.

आतापर्यंत वजू करण्यासाठी सैनिक तडफडत होते. आता अल्लाहची वाणी अवतरली होती. पाणी नसेल तर किती सोपी बाब अल्लाहने आपल्यासाठी सांगितली. साऱ्या सैनिकाना आनंद झाला. सारे लोक दुवा देऊ लागले. हजरत अबूबकर (रजि.) आपल्या मुलीवर रागावले होते. अबूबकर म्हणाले की, मला माहीत नव्हते की तू एवढी आदरणीय आहे. तुझ्यामुळे मुसलमानाना अल्लाहने किती सोपी पद्धत बहाल केली.

या सर्व घटनेनंतर काफिला पुढे जाण्यासाठी निघाला. उंटाला उठविले गेले. त्या उंटाच्या खाली तो हार पडलेला होता. पाणी नसेल तर पवित्र मातीने वजू करणे. त्याला तय्यमूम असे म्हणतात.

***

९ । उम्मूल मोमीनीन हजरत आएशा (रजि.) यांचा शेवटचा प्रवास.

आमीर माअविया (रजि.) यांच्या खिलापतीचा शेवटचा हिस्सा हजरत आएशा (रजि.) यांचा शेवटचा जमाना आहे. त्यावेळी हजरत आएशा (रजि.) यांचे वय सदुसष्ट होते. सन ५८ हिजरीत रमजानच्या महिन्यात आजारी पडल्या. काही दिवस त्या अंथरूणावर होत्या. कोणी विचारपूस केले तर म्हणायची की मी ठीक आहे. हजरत इब्ने अब्बास भेटण्यासाठी आल्यानंतर त्याना भेटण्याची परवानगी दिली नाही. भाच्यानी विनंती केल्यानंतर परवानगी दिली. कारण की ते उगीचच आपली स्तुती करतील याची भीती हजरत आएशा (रजि.) याना होती. त्यासाठी भेटायला परवानगी देत नव्हत्या.

हजरत इब्ने अब्बास (रजि.) म्हणाले की आपले नाव उम्मूल मोमीनीन आहे. आपण प्रेषितांची प्रिय पत्नी आहात. अल्लाहने आपल्यामुळे तय्यमूमची परवानगी दिली. आपल्यामुळे आयते अवतरली. ही आयते मस्जिदीत रात्र व दिवस पठण केली जातात. हे सारे ऐकून हजरत आएशा

(रजि.) म्हणतात की ही स्तुती करू नका. मला माफ करा.

शेवटची वसीयत

आजार वाढला होता. हजरत आएशा (रजि.) म्हणाल्या की मला प्रेषितांच्या हुजऱ्यात दफन करू नका. मला इतर प्रेषितांच्या पत्नी सोबत जन्नतुल बकीहमध्ये दफन करा. मला रात्री दफन करा. सकाळ होण्याची वाट पाहू नका.

रमजान महिन्याची सतरा तारीख होती. माहे जून ६७८ हिजरीमध्ये ईशाच्या नमाजनंतर रात्री निधन झाले. अन्सार आपल्या घरातून बाहेर आले. स्त्रियांची प्रचंड गर्दी पडलेली होती. सण आहे असे वाटत होते. हजरत उम्मे सलमा (रजि.) म्हणाली की हजरत आएशा (रजि.) यांच्यासाठी स्वर्ग आहे. ती प्रेषितांची प्रिय पत्नी आहे.

नमाज जनाजा (अंतिम नमाज)

या काळात हजरत अबू हुरेश (रजि.) मदिन्यात वैद्य होते. त्यांनी जनाज्याची नमाज अदा केली. कासिम बिन महमद बिन अबूबकर, अब्दुल्ला बिन अ. रहेमान बिन अबूबकर, अब्दुला बिन अतिक, अरवाह बिन जुबेर, अब्दुल्ला इब्ने जुबेर या पुतण्या व भाच्यानी हजरत आएशा (रजि.) यांचे प्रेत कबरीत उतरविले. त्यानी सांगितल्याप्रमाणे जन्नतुल बकीहमध्ये दफन करण्यात आले. यादिवशी साऱ्या मदिना शहरात कयामत आली की काय? असे वातावरण होते. आज नबीची आणखी एक मेणबत्ती विझली होती.

हजरत आएशा (रजि.) यांनी आपल्यानंतर काही संपत्ती मागे ठेवल्या होत्या. त्यात एक जंगल होते. हे जंगल हजरत अस्मा (रजि.) यांच्या वाटणीला आले. हे जंगल अमीर माअविया (रजि.) यांनी एक लाख दिरहमला खरेदी केले. हजरत अस्मा (रजि.) याने ही रक्कम गरिबाना वाटली.

***